| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 100/2025 | श्री. वारे गोविंद धनाजी, मु.पो.खेड ता. जि.धाराशिव | कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद धाराशिव | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद धाराशिव | |
| 2 | 260/2025 | श्री. बाळासाहेब दिगंबर होरे, मु.पो. श्रीपुर ता. माळशिरस जि. सोलापुर-413112 | सहाय्यक प्रशासन अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद धाराशिव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद धाराशिव | |
| 3 | 262/2025 | श्री. बाळासाहेब दिगंबर होरे, मु.पो. श्रीपुर ता. माळशिरस जि. सोलापुर-413112 | सहाय्यक प्रशासन अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद धाराशिव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद धाराशिव | |
| 4 | 862/2025 | श्री. विकास जगन बनसोडे, रा. सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर मार्ग, अजिंठा नगर, धाराशिव | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद धाराशिव | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद धाराशिव | |
| 5 | 569/2025 | श्री. प्रेमनाथ मनोहर सुर्यवंशी, रा. मतोळा पो. नारंगवाडी ता. उमरगा जि. धाराशिव | उप अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, उमरगा जि. धाराशिव | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 6 | 2112/2025 | श्री. योगेश बळीराम कानडे, रा. काक्रंबा ता. तुळजापुर जि. धाराशिव | सहाय्यक प्रशासन अधिकारी (साप्रवी विभाग), जिल्हा परिषद धाराशिव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवी), जिल्हा परिषद धाराशिव | |
| 7 | 3497/2025 | श्रीमती. कलावती शिवाजी कज्जेवाड, मु.पो. गुंडोपंत दापका ता. मुखेड जि. नांदेड | प्राचार्य, शांतेश्वर दिव्यांग व्यावसाईक प्रशिक्षण केंद्र सास्तुर ता. लोहारा जि. धाराशिव | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 8 | 3498/2025 | श्रीमती. कलावती शिवाजी कज्जेवाड, मु.पो. गुंडोपंत दापका ता. मुखेड जि. नांदेड | कार्यालय अधिक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 9 | 718/2025 | श्री. सचिन विजयकुमार सर्जे, रा. शाहु नगर धाराशिव | यांत्रिक विभाग, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, धाराशिव | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, धाराशिव | |
| 10 | 719/2025 | श्री. सचिन विजयकुमार सर्जे, रा. शाहु नगर धाराशिव | उप कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद धाराशिव | कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद धाराशिव | |

सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी

लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 720/2025 | श्री. सचिन विजयकुमार सर्जे, रा. शाहु नगर धाराशिव | उप कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, धाराशिव | कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, धाराशिव | |
| 12 | 721/2025 | श्री. सचिन विजयकुमार सर्जे, रा. शाहु नगर धाराशिव | प्रशासकीय अधिकारी (साप्रवि). जिल्हा परिषद धाराशिव | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद धाराशिव | |
| 13 | 722/2025 | श्री. सचिन विजयकुमार सर्जे, रा. शाहु नगर धाराशिव | मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवळाली ता. जि. धाराशिव | केंद्रप्रमुख, केंद्र रुईभर, ता.जि. धाराशिव | |
| 14 | 723/2025 | श्री. सचिन विजयकुमार सर्जे, रा. शाहु नगर धाराशिव | कृषि अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. उस्मानबाद | |
| 15 | 724/2025 | श्री. सचिन विजयकुमार सर्जे, रा. शाहु नगर धाराशिव | सहाय्यक जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे, धाराशिव | जिल्हा जलसंधारण अधिकारी, जिल्हा परिषद लघु पाटबंधारे, धाराशिव | |
| 16 | 1726/2025 | श्री. सिचन विजयकुमार सर्जे रा. शाहु नगर धाराशिव | सहाय्यक प्रशासन अधिकारी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 17 | 1727/2025 | श्री. सिचन विजयकुमार सर्जे रा. शाहु नगर धाराशिव | उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 18 | 1728/2025 | श्री. सिचन विजयकुमार सर्जे रा. शाहु नगर धाराशिव | ज.मा.अ. (यांत्रिक), विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, धाराशिव | उप अभियंता, (यांत्रिक), विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, धाराशिव | |
| 19 | 1729/2025 | श्री. सिचन विजयकुमार सर्जे रा. शाहु नगर धाराशिव | ज.मा.अ. (यांत्रिक), विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, धाराशिव | उप अभियंता, (यांत्रिक), विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, धाराशिव | |
| 20 | 1730/2025 | श्री. सिचन विजयकुमार सर्जे रा. शाहु नगर धाराशिव | ज.मा.अ. (यांत्रिक), विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, धाराशिव | उप अभियंता, (यांत्रिक), विभाग, जिल्हा परिषद उपविभाग, धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 1731/ 2025 | श्री. सिचन विजयकुमार सर्जे रा. शाहु नगर धाराशिव | उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 22 | 1732/ 2025 | श्री. सिचन विजयकुमार सर्जे रा. शाहु नगर धाराशिव | उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 23 | 1733/ 2025 | श्री. सिचन विजयकुमार सर्जे रा. शाहु नगर धाराशिव | उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 24 | 833/2 025 | श्री. अफसर ईसाक ईनामदार, रा. उमरगा (चि), ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय उमरगा (चि), ता.तुळजापुर जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचयत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 25 | 1137/ 2025 | श्री.विजय मारुती क्षीरसागर, मु.पो. तीर्थ (खुर्द), ता.तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय तिर्थ (खुर्द), ता. तुळजापुर जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 26 | 1138/ 2025 | श्री.विजय मारुती क्षीरसागर, मु.पो. तीर्थ (खुर्द), ता.तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय तिर्थ (खुर्द), ता. तुळजापुर जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 27 | 1139/ 2025 | श्री.विजय मारुती क्षीरसागर, मु.पो. तीर्थ (खुर्द), ता.तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय तिर्थ (खुर्द), ता. तुळजापुर जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 28 | 1329/ 2025 | श्री. योगेश बळीराम कानडे, रा. काक्रंबा ता. तुळजापुर जि.धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 29 | 1460/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 30 | 1461/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 31 | 1462/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 32 | 1463/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 33 | 1464/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 34 | 1465/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 35 | 1466/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 36 | 1467/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 37 | 1468/ 2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 38 | 1865/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 39 | 1866/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 40 | 1867/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 41 | 1868/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 42 | 1869/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 43 | 1870/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 44 | 1871/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 45 | 1872/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 46 | 1873/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 47 | 1874/ 2025 | श्री. नामदेव मकराम मनसावळे, रा. खडकी ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय खडकी ता.तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 48 | 2124/ 2025 | श्री. सुर्यवंशी वसंत कांबळे, रा. काटगाव ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटगांव ता. तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 49 | 2381/ 2025 | श्री. शक्ती पांडुरंग पांडागळे, मु.पो अपसिंगा ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय कात्री ता. तुळजापुर जि.उसमानाबाद | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 50 | 2877/ 2025 | श्रीमती. शैनाज फिरोज नदाफ, मु.पो. केसुर ता. दक्षिण सोलापुर | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचयत कार्यालय होर्टी ता. तुळजापुर जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 51 | 3327/2025 | श्री. संजय महादेवराव सोनवणे, रा. राजे संभाजी नगर, मोतीझरा विभाग, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय सिंदफळ ता. तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि. धाराशिव | |
| 52 | 4635/2025 | श्री. रमजान बंदुभाई नदाफ, मु.पो. कुसुर ता. दक्षिण सोलापुर जि. सोलापुर | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय होर्टी ता. तुळजापुर जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 53 | 4877/2025 | श्री. प्रविण कचरु वाव्हळ, मु.पो. ढवळपुरी ता. पारनेर जि. अहिल्यानगर | ज.मा.अ. पंचायत समिती कार्यालय तुळजापुर जि.धाराशिव | गट विकास अधिकारी, पंचायत समिती तुळजापुर जि.धाराशिव | |
| 54 | 716/2025 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे दुमाला पो. खामगांव ता.जि. धाराशिव-413508 | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचयत समिती धाराशिव | |
| 55 | 2599/2025 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे दु पो. खामगांव ता. जि. धाराशिव | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय जावळे दु ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 56 | 3502/2025 | श्री. प्रकाश गणपती सोनार, रा. जवळे (दु), ता. जि. धाराशिव | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 57 | 717/2025 | श्री. सुनिल दशहर काळे, रा. जवळे (दु), पो. खामगांव ता.जि. धाराशिव-413509 | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय जवळे (दु), ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचयत समिती धाराशिव | |
| 58 | 3281/2025 | श्री. शेख शरीफ काशिमलाल, रा. बेंबळी ता. जि. धाराशिव | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बेंबळी ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 59 | 1308/2025 | श्री. चंद्रकांत रंगनाथ गरड, रा. धुळे सोलापुर रोड गणपती मंदिर येडशी ता. जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय येडशी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 60 | 1896/2025 | श्री. गोपाळ हरिबा आदटराव, मु.पो. करजखेडा ता.जि. धाराशिव | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय करजखेडा ता. जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 61 | 2477/2025 | श्री. श्रीकांत रमाकांत हाजगुडे, रा. रामवाडी ता.जि. धाराशिव | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, रामवाडी ता.जि.धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 62 | 2573/2025 | श्रीमती. उषाबाई सत्यवान ढवळे, मु. बरमगाव (बु), पो. रुईभर, ता. जि. धाराशिव | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय बरमगाव (बु), ता.जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती, धाराशिव | |
| 63 | 3744/2025 | श्री. सुनिल अशोक पाटील, रा. शिवाजी नगर येडशी ता.जि. धाराशिव | ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, येडशी ता. जि. धाराशिव | विस्तार अधिकारी, पंचायत समिती धाराशिव | |
| 64 | 113/2025 | श्री. सयाजी रामराव साठे, मु. भोयरे पो. नरखेड ता. माहोळ जि. सोलापुर | सहय्यक अभियंत श्रेणी-01, कृष्णा मराठवाडा बांधकाम उपविभाग क्र. 06, तुळजापुर जि. धाराशिव | कार्यकारी अभियंता, कृषि मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, धाराशिव | |
| 65 | 2761/2025 | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, रा. प्लॉट नंबर ए-51, नाथनगर सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | |
| 66 | 2762/2025 | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, रा. प्लॉट नंबर ए-51, नाथनगर सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | |
| 67 | 2763/2025 | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, रा. प्लॉट नंबर ए-51, नाथनगर सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | |
| 68 | 2764/2025 | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, रा. प्लॉट नंबर ए-51, नाथनगर सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | |
| 69 | 2765/2025 | श्री. मनिष भगवानदास अग्रवाल, रा. प्लॉट नंबर ए-51, नाथनगर सिंधी कॉलनी मागे, छत्रपती संभाजीनगर | उप कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र. 01, सिचंन भवन, आनंदनगर, धाराशिव | |
| 70 | 259/2025 | श्री. बाळासाहेब दिंगबर होरे, मु.पो. श्रीपुर ता. माळशिरस जि. सोलापुर-413112 | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय परंडा जि. धाराशिव | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय परंडा जि. धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 71 | 1711/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि. धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरुवर्य रा. गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि. धाराशिव | |
| 72 | 1658/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| 73 | 1663/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| 74 | 1664/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| 75 | 1665/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| 76 | 1668/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| 77 | 1669/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| 78 | 1670/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| 79 | 1671/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| 80 | 1672/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | ज.मा.अ. शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | पाचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य, रा.गे. शिंदे महाविद्यालय परंडा जि.धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 81 | 792/2025 | श्री. मृत्युंजय वि. कुलकर्णी रा. F 157/07, स्वामी विवेकानंद नगर, रामटेकडी PWD बस स्टॅप जवळ, हडपसर पुणे-411013 | रचना सहयक, सहायक संचालक, नगर रचना विभाग मध्यवर्ती पशासकीय इमरात तळ मजला खोली क्र. 26 धाराशिव | सहाय्यक संचालक, सहायक संचालक, नगर रचना विभाग मध्यवर्ती पशासकीय इमरात तळ मजला खोली क्र. 26 धाराशिव | |
| 82 | 4636/2025 | श्री. अमोल हरिश्चंद्र फरताडे, रा. तेरखेडा ता. वाशी जि.धाराशिव | रचना सहाय्यक, सहायक संचालक नगर रचना विभाग मध्यवर्ती प्रशासकीय इमरात तळ मजला, खाली क्र. 07 धाराशिव | सहाय्यक संचालक, सहायक संचालक नगर रचना विभाग मध्यवर्ती प्रशासकीय इमरात तळ मजला, खाली क्र. 07 धाराशिव | |
| 83 | 4696/2025 | श्री.विकास जगन बनसोडे, रा. सुर्यपुत्र भौयासाहेब आंबेडकर मार्ग, अजिंठा नगर धाराशिव | सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यालय, धाराशिव | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यालय, धाराशिव | |
| 84 | 2768/2025 | श्री. संजय महादेवराव सोनवणे, रा. राजे संभाजी नगर, मोतीझरा विभाग, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय धाराशिव | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय धाराशिव | |
| 85 | 4727/2025 | श्री. ब्रम्हदेव सुर्यभान निरपळ, रा. मागेवाडी ता. भुम जि. धाराशिव | बाल विकास प्रकल्प अधिकारी, कार्यालय भुम जि.धाराशिव | जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी, धाराशिव | |
| 86 | 1322/2025 | श्री. खंडागळे जीवन सुरेश, रा. शिक्षक सोसायटी कुर्डुवाडी रोड, परंडा ता. परंडा जि. धाराशिव | प्राचार्य, शिक्षण महर्षी गुरवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालय परंडा जि. धाराशिव | सहसंचालक तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद | |
| 87 | 2572/2025 | श्री. सुभाष गणपती कदम, मु. पनवाडी पो. तेर ता.जि. धाराशिव | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, धाराशिव | जिल्हा उपनिंधक, सहकारी संस्था मध्यवर्ती प्रशासकीय इमारात, पहिला मजला, खाली क्र. 52, धाराशिव | |
| 88 | 2864/2025 | श्रीमती. चंद्रकला किसनराव पाटील, रा. दर्गा रोड, नवीन पोष्ट ऑफिस परंडा ता.परंडा जि.धाराशिव | उपस्मानाबाद जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउदेशीय वि. बँक, धाराशिव तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धाराशिव | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धाराशिव | |
| 89 | 3647/2025 | श्री. भिका सुदामराव विद्यागर, रा. नेताजी गोरे (माळी), म. फुले सभागृहा जवळ तांबरी विभाग, धाराशिव | ज.मा.अ. क्रातीवीर लघु उद्योग व कुटीर उद्योग सहकारी पतसंस्था, मर्या धाराशिव | ज.अ.अ. क्रातीवीर लघु उद्योग व कुटीर उद्योग सहकारी पतसंस्था, मर्या धाराशिव | |
| 90 | 4777/2025 | श्री. सोमनाथ दादाराव डाके, रा. ताबंरी विभाग बार्शी नाका, धाराशिव | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, धाराशिव | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकी इमरात पहिला मजला, खोली क्र. 52, धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 91 | 4778/2025 | श्री. सोमनाथ दादाराव डाके, रा. तांबरी विभाग बार्शी नाका, धाराशिव | सह जिल्हा निबंधक वर्ग-02, सह जिल्हा निबंधक कार्यालय मध्यवर्ती प्रशासकी इमरात पहिला मजला, खोली क्र. 18, धाराशिव | सह जिल्हा निबंधक वर्ग-01, तथा मुद्राक जिल्हाधाकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकी इमरात पहिला मजला, खोली क्र. 18, धाराशिव | |
| 92 | 4779/2025 | श्री. सोमनाथ दादाराव डाके, रा. तांबरी विभाग बार्शी नाका, धाराशिव | उप यंत्र अभियंता, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ धाराशिव | विभागीय नियत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ धाराशिव | |
| 93 | 4780/2025 | श्री. सोमनाथ दादाराव डाके, रा. तांबरी विभाग बार्शी नाका, धाराशिव | विभागीय भांडार अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ धाराशिव | विभागीय नियत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ धाराशिव | |
| 94 | 4781/2025 | श्री. सोमनाथ दादाराव डाके, रा. तांबरी विभाग बार्शी नाका, धाराशिव | प्रबंधक, जिल्हा न्यायालय, धाराशिव | ज.अ.अ. जिल्हा न्यायालय, धाराशिव | |
| 95 | 4782/2025 | श्री. भास्कार महादेव वारे, रा. साहिल कॉम्प्लेक्स, नगर रोड भुम ता. भुम जि. धाराशिव | तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय मध्यवर्ती प्रशासकी इमरात पहिला मजला, खोली क्र. 22, भुम जि.धाराशिव | उपविभागीय कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय मध्यवर्ती प्रशासकी इमरात पहिला मजला, खोली क्र. 22, भुम जि.धाराशिव | |
| 96 | 4783/2025 | श्री. भास्कार महादेव वारे, रा. साहिल कॉम्प्लेक्स, नगर रोड भुम ता. भुम जि. धाराशिव | कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय भुम जि. धाराशिव | तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय भुम जि. धाराशिव | |
| 97 | 271/2025 | श्री. अशोक दत्तु देशमुख, रा. घर नंबर 630, वेताळ नगर तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय धाराशिव | |
| 98 | 1287/2025 | श्री. अभय विलास माने, रा. शुक्रावार पेठ पुणे गल्ली तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | |
| 99 | 1400/2025 | श्री. गुरुसिध्दमा बसवण्णा कोनाळे, रा. फ्लॅट नबंर 2002, कासा फॉरेस्ट लोढा प्रिमाअर कल्याण शिळ रोड डोंबीवली (पुर्व), 431204 | मुख्यलय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | |
| 100 | 1623/2025 | श्री. अंबादास बाळासाहेब वऱ्हाडे, रा. वेताळ नगर तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 101 | 3800/2025 | श्री. अमेश राजेंद्र गोसावी, रा. आरळी बुद्रुक ता. तुळजापुर जि.धाराशिव | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय तुळजापुर जि.धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 102 | 4054/2025 | श्री. आण्णासाहेब पांडुरंग गुंड, रा. सुरतगाव ता. तुळजापुर जि. धाराशिव | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कर्यालय तुळजापुर जि.धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कर्यालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 103 | 2909/2025 | श्री. शहाजी नानासाहेब बनगर, रा. गट नंबर 64, प्लॉट नंबर 59, अंजनी पार्क पाखरी पळशी (शहर) छत्रपती संभाजीनगर | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय भुम जि. धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय भुम जि. धाराशिव | |
| 104 | 746/2025 | श्री. सैलानी हजिमलंग शेख रा. मलकापुर ता. कळंब जि.धाराशिव | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कळंब जि. धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कळंब जि. धाराशिव | |
| 105 | 748/2025 | श्री. सैलानी हजिमलंग शेख रा. मलकापुर ता. कळंब जि.धाराशिव | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कळंब जि. धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कळंब जि. धाराशिव | |
| 106 | 4008/2025 | श्री. विकास उत्तमराव चव्हाण, रा. गांधी नगर कळंब ता. कळंब जि. धाराशिव | मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कळंब जि.धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय कळंब जि.धाराशिव | |
| 107 | 567/2025 | श्री. प्रेमनाथ मनोहर सुर्यवंशी, रा. मतोळा पो. नारंगवाडी ता. उमरगा जि. धाराशिव | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय उमरगा जि. धाराशिव | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यालय उमरगा जि. धाराशिव | |
| 108 | 3649/2025 | श्री. अजिनाथ अंगद राऊत मु.पो. राऊत गल्ली जवळा (नि), ता. परंडा जि. धाराशिव | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन धाराशिव | प्रादेशिक उपायुक्त, सामज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जुनी डाल्डा फॅक्ट्री मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोर, लातुर | |
| 109 | 3650/2025 | श्री. अजिनाथ अंगद राऊत मु.पो. राऊत गल्ली जवळा (नि), ता. परंडा जि. धाराशिव | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन धाराशिव | प्रादेशिक उपायुक्त, सामज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जुनी डाल्डा फॅक्ट्री मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोर, लातुर | |
| 110 | 3651/2025 | श्री. अजिनाथ अंगद राऊत मु.पो. राऊत गल्ली जवळा (नि), ता. परंडा जि. धाराशिव | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन धाराशिव | प्रादेशिक उपायुक्त, सामज कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन जुनी डाल्डा फॅक्ट्री मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोर, लातुर | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 24.11.2025 | | वेळ दुपारी 02.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 111 | 4235/2025 | श्री. राठोड नामदेव अंबादास, रा. सेवालाल कॉलनी तेरणा कॉलेज जवळ येडशी रोड, ता.जि. धाराशिव | सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण धाराशिव | प्रादेशिक उपसंचालक, इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक), विभाग. लातुर | |
| 112 | 400/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. गांधी मार्केट स्टेशन रोड, परळी वेजीनाथ ता. परळी वैजीनाथ जि. बीड | डायटीशन अधिकारी , उप जिल्हा रुग्णालय, तुळजापुर जि. धाराशिव | मनी डायटीशन अधिकारी (अल्प आहार तज्ञ), उप जिल्हा रुग्णालय, तुळजापुर जि. धाराशिव | |
| 113 | 1475/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | ज.अ.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 114 | 1476/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | ज.अ.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 115 | 1477/0225 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | ज.अ.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 116 | 1478/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | ज.अ.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 117 | 1479/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | ज.अ.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 118 | 1480/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | ज.अ.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 119 | 1481/2025 | श्री. वैजनाथ शामराव सुरवसे, रा. मातोश्री ज्युस सेंटर मलबा हॉस्पटल शेजारी भवानी रोड, तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | ज.मा.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | ज.अ.अ. उपजिल्हा रुग्णालय तुळजापुर जि.धाराशिव | |
| 120 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १००/२०२५**
**बोर्ड क्र.०१**

श्री.वारे गोविंद धनाजी,
रा.खेड, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, श्री.कांबळे पी.के. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.पी.एस.हंगळे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.१०.२०२४ | खेड येथील संगणक परिचालक यांचा वेतन तपशिल मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या आपले सरकार सेवा केंद्र या संकलनाशी संबंधित असल्यामुळे दि.१०.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन देण्याचे संबंधित संकलनास कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थीस अद्याप माहितीचे प्रदान झालेले नाही. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.१८.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी (आपले सरकार सेवा केंद्र) यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि

सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (वेतनातील कपातीचा भाग वगळून), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. सहायक गट विकास अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18849 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २६०/२०२५**
**बोर्ड क्र.०२**

श्री.बाळासाहेब दिंगबर होरे, — अपिलार्थी
रा.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापुर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्रीमती अनिता बाळासाहेब होरे, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, श्री. पी.के.कांबळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.पी.एस.हंगळे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०८.२०२४ | पंचायत समिती परंडा दि.२९.१२.२०२१ व दि.०४.०२.२०२२ रोजीचे अहवाल व कारणे दाखवा नोटीस, श्री.जी.एच.कांबळे व श्री.ए.एस.चव्हाण यांना कारणे दाखवा नोटीस व त्यांचा खुलासा दि.२४.०१.२०२२ व दि.२९.०५.२०२३ रोजी दाखल केलेला आहे, खुलासा अंती यांच्यावरती काय कार्यवाही केली त्या कार्यवाहीचा तपशिल व इतर दोन मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पंचायत समिती, परंडा या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.१७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये परंडा पंचायत समितीकडे कलम ६ (३) नुसार हस्तांतरित करण्यात आलेला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचा

माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी पंचायत समिती, परंडा या कार्यालयाकडे हस्तांतरित केला असल्याची बाब निदर्शनास आली असल्यामुळे पंचायत समितीकडील प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील सादर करण्याचे अपिलार्थी यांना सुचित करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट माहिती मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा दि.२७.०८.२०२४ रोजीचा माहिती अर्ज दि.१७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये पंचायत समिती, परंडा या कार्यालयाकडे हस्तांतरित केलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती दुसऱ्या कार्यालयाशी / प्राधिकरणाशी संबंधित असल्यास अशा माहितीकरिता अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) मधील तरतुदीनुसार जास्तीत जास्त पाच दिवसाच्या मुदतीत माहितीशी संबंधित कार्यालयाकडे / प्राधिकरणाकडे हस्तांतरित करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे कलम ६ (३) नुसार विहित मुदतीत हस्तांतरण झाले नसल्यामुळे आता अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावी लागेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती ज्या कार्यालयाशी संबंधित आहे ती त्या कार्यालयाकडुन (पंचायत समिती, परंडा) अधिनियमातील कलम ५ (४) नुसार एकत्रित / संकलित करुन अशी माहिती अपिलार्थी यांना, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. सहायक गट विकास अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18845 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २६२/२०२५
बोर्ड क्र.०३

श्री.बाळासाहेब दिंगबर होरे,
रा.श्रीपूर, ता.माळशिरस, जि.सोलापुर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ प्रशासन अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी श्रीमती अनिता बाळासाहेब होरे, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, श्री. पी.के.कांबळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.पी.एस.हंगळे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०८.२०२४ | जिल्हा परिषद धाराशिव येथे तक्रारी अर्ज दि.१४.०९.२०२१ रोजी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने, नोटीस, खुलासा व अहवाल तसेच निर्णय व आदेशांच्या तसेच केलेल्या कार्यवाहीचा सर्व संपूर्ण मूळ संचिका कागदपत्रे मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण आहे. त्यामुळे माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.१७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांचे प्रतिनिधी (पत्नी) यांनी व्यक्तिशः स्विकारुन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती संचिकेमध्ये उपलब्ध नाही. अपिलार्थी

यांचे प्रतिनिधी (पत्नी) यांनी अभिलेखात उपलब्ध असलेल्या संचिकेचे अवलोकन देखील केलेले आहे. आज सुनावणीकरिता अपिलार्थी यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांची पत्नी उपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अर्धवट माहिती मिळाली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18846 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८६२/२०२५**
**बोर्ड क्र.०४**

श्री.विकास जगन बनसोडे,
रा.सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर मार्ग, अंजिठा नगर, धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.व्ही.व्ही.वायचळ व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.एस.एस.वागज उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.१०.२०२४ | जिल्हा परिषद अंतर्गत १४ वा वित्त आयोग उस्मानाबाद सर्कल निधी मंजुर, खर्च, प्रस्तावित केलेली कामे, तांत्रिक मान्यता, प्रशासकीय मान्यता, कार्यारंभ आदेश, सी.सी.यु.सी., एम.बी., प्रथम आणि अंतिम देयक, कामाचे फोटो, जिओ टॅगिंग, काम करणारी एजन्सीची माहिती, दि.०१.०४.२०१६ ते दि.१५.०७.२०२४, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. तसेच ती एका पेक्षा जास्त विषयाशी संबंधित आहे. म्हणून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०७.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, एका विषयाशी संबंधित माहिती हवी असल्यास स्वतंत्र अर्ज करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी

दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपातील माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत. या सर्व बाबी विचारात घेता, या प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.१२.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18857 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५६९/२०२५**
**बोर्ड क्र.०५**

श्री.प्रेमनाथ मनोहर सुर्यवंशी, — अपिलार्थी
रा.मतोळा, पो.नारंगवाडी, ता.उमरगा, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उप अभियंता,
जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, उमरगा, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच, आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, श्री.एन.ए.भुसारे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०२.२०२४ | जलजीवन मिशन योजनेअंतर्गत मातोळा ता.उमरगा येथे पारस कन्स्ट्रक्शन, अजय नगर, उमरगा काम करत असलेल्या कामाचा प्रगती अहवालाच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०६.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.१८.०६.२०२४ रोजी अपिलार्थी यांना व्यक्तिश: उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन, संपूर्ण माहिती मिळाली, अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व माहिती प्राप्त करुन अपिलार्थी यांनी पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18848 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २११२/२०२५**
**बोर्ड क्र.०६**

श्री.योगेश बळीराम कानडे, — अपिलार्थी
रा.काक्रंबा, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक प्रशासन अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि),
जिल्हा परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.खरसाडे पी.आर., कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.तुकाराम भालके, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, श्री.काळे ए.पी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०२.२०२५ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांच्या दौऱ्याबाबत मार्च २०२३ ते आजपर्यंतची माहिती,<br>१.गट विकास अधिकारी यांनी तालुक्यामध्ये चालु असलेल्या व पूर्ण झालेल्या विविध विकास कामांच्या तपासणी करिता केलेल्या दौऱ्यांची गावनिहाय माहिती,<br>२. अर्धवट स्थितीत असलेल्या विकास कामांना भेटी दिल्यानंतर तयार केलेल्या अहवालाची प्रत,<br>३. कामे अर्धवट किंवा निकृष्ट दर्जाची असतील तर संबंधित ठेकेदार व अधिकारी यांच्या कोणत्या स्वरुपाची कारवाई केली त्याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती विलंबाने मिळालेली आहे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जिल्हा परिषदचे अधिनस्त सा.प्र.वि. नेमणूक-१ संकलन व तुळजापूर पंचायत

समिती कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे दि.२८.०२.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज संबंधित संकलन व तुळजापूर पंचायत समितीकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. या नंतर दि.२८.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती कार्यालयाकडे (सा.प्र.वि., जि.प.) उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२३.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज जिल्हा परिषदेकडुन पंचायत समितीकडे हस्तांतरित झालेला असुन या अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आलेला आहे. सदर माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन दि.१९.११.२०२५ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी, माहिती मिळाली असल्याचे व तक्रार नसल्याचे नमूद करुन अर्ज निकाली काढणेबाबत नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे विस्तृत स्वरुपाची माहिती मोघमपणे मागितलेली आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. मात्र या प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असुन माहिती प्राप्त करुन घेऊन अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असल्याचे व तक्रार नसल्याचे लेखी स्वरुपात मान्य केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. १८८४९ दिनांक : 29/12/2025
प्रत :- जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३४९७/२०२५**
**बोर्ड क्र.०७**

श्रीमती कलावती शिवाजी कज्जेवाड,
रा.गुंडोपंत दापका, ता.मुखेड, जि.नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
शांतेश्वर दिव्यांग व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र, सास्तुर,
ता.लोहारा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०३.२०२५ | मी दि.१७.०१.२०२५ रोजी टपालाव्दारे कार्यालयास सुनिता गिरषवाड व भिमराव गिरषवाड यांच्या विरोधात केलेल्या तक्रार अर्जावर आज रोजी पर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती व सदर तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्राची छायांकित प्रत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पुरविण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत नसल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18841 दिनांक :- 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ३४९८/२०२५**
**बोर्ड क्र.०८**

श्रीमती कलावती शिवाजी कज्जेवाड,
रा.गुंडोपंत दापका, ता.मुखेड, जि.नांदेड — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०३.२०२५ | सन २०२३ ते आजरोजी पर्यंत ज्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पुरस्कार मंजुर व प्रदान करण्यात आलेले आहेत त्यांची नावे, त्या कर्मचाऱ्यांच्या कार्यरत शाळेचे / संस्थेच्या नावाची यादीसह कागदपत्राच्या छायांकित प्रती, पुरस्कार मंजुर करण्याबाबतच्या नियम, अटी, शर्ती व नियमावलीची माहिती, दि.२९.०१.२०२५ रोजी टपालाव्दारे कार्यालयास सुनिता गिरषवाड व भिमराव गिरषवाड यांच्या विरोधात केलेल्या तक्रार अर्जांवर आज रोजी पर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती व सदर तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या कागदपत्राची छायांकित प्रत, दि.२८.१०.२०२४ आपल्या कार्यालयाकडील पत्रान्वये मुख्याध्यापक, निवासी दिव्यांग शाळा, सास्तूर, ता.लोहारा या कार्यालयाकडील प्राप्त अहवालाच्या छायांकित प्रती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न पुरविल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची व एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित असुन काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर माहिती अनुज्ञेय आहे. तसेच विस्तृत स्वरुपाची माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक

प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाही. तसेच त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही जनहित दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18842 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७१८/२०२५**
**बोर्ड क्र.०९**

श्री.सचिन विजयकुमार सर्जे,
रा.शाहु नगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता (यां),
यांत्रिकी विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, श्री.एस.पी.शिंदे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०९.२०२४ | जल जिवन मिशन अंतर्गत दि.०१.०४.२०२२ पासुन बसविण्यात आलेल्या सोलार पंपाची संपूर्ण निविदा संचिका, कार्यारंभ आदेश, काम पूर्णत्वाचा दाखल, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका व पूर्णत्वाचा दाखल्याची छायांकित प्रत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२५.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहितीच्या २३८०० इतक्या पृष्ठांकरिता रु.४७,६००/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थीस विहित मुदतीत सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी अद्याप माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केलेला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देत नाहीत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीच्या विहित शुल्काचा भरणा करणेबाबत

कळविले असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी विहित शुल्काचा भरणा केला असल्याचे आयोगापुढील कागदपत्रावरुन दिसुन येत नाही. तसेच आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18843 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७१९/२०२५
बोर्ड क्र.१०

श्री.सचिन विजयकुमार सर्जे,
रा.शाहु नगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (बांधकाम),
जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपकार्यकारी अभियंता, श्री.वायचळ व्ही.व्ही. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.एस.एस.वागज उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ०९ | ०३.०९.२०२४ | दि.०१.०४.२०२१ ते आजतागायत, बांधकाम विभागातंर्गत असलेल्या विद्युत कामासंबंधित काढण्यात आलेल्या उपअभियंता, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या आदेशाच्या प्रतीची छायांकित प्रत मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१९.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, पुन:श्च एकदा शहानिशा करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देशित केलेले आहे. त्यानुसार दि.२३.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आली असल्याचे व इतर अभिलेखे कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले असल्याचे अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले

आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18850 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ७२०, १७२७, १७३१, १७३२ व १७३३/२०२५ (०५)**

श्री.सचिन विजयकुमार सर्जे,
रा.शाहु नगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ (०१), दि.०२.०५.२०२५ (०४) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.बी.व्ही.ढवळे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ११ | ११.१०.२०२४ | कार्यकारी अभियंता यांच्या विभागीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, शाखा अभियंता व कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची दौरा दैनंदिनी मिळणेबाबत, |
| १७ | ११.१२.२०२४ | काळ्या यादीमध्ये नाव समाविष्ठ करण्याची शिफारस करण्यात आलेली आहे, कोणत्या कायद्यानुसार, काळ्या याद्या कोण तयार करते व त्याचे अधिकार कोणाला आहेत याची माहिती, |
| २१ | ३१.१०.२०२४ | मार्च २०२१ ते आजपर्यंत, जिल्ह्यामध्ये जल जीवन मिशन अंतर्गत प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदेबाबत, पात्र / अपात्र तक्ता, दराचा लिफाफा, निविदा इतिवृत्त, कार्यारंभ आदेश, मोजमाप पुस्तिकेत नोंदविलेले मापे, ठेकेदाराला आजतागायत दिलेले देयकाची रक्कमची माहिती, |
| २२ | ०५.११.२०२४ | कार्यकारी अभियंता यांच्या विभागीय कार्यालयातील मार्च २०२२ ते मार्च २०२३ ते आजतागायत पर्यंत प्रलंबित असलेल्या लेखा परीक्षणाची मुद्देनिहाय माहिती, |
| २३ | ०५.११.२०२४ | कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी माहे जुलै २०२२, २०२३ व जुलै २०२४ या महिन्यातील पगार पत्रकाची छायांकित प्रत |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, बोर्ड क्र.११, १७, २१, २२ व २३ मधील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार त्यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस अनुक्रमे दि.२२.१०.२०२४, दि.१२.१२.२०२४, दि.२७.११.२०२४, दि.२७.११.२०२४ व दि.२६.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती, टोलवाटोलवीची उत्तर, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त पाच व्दितीय अपील निकाली काढण्यांत येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18839 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७२१/२०२५
बोर्ड क्र.१२

श्री.सचिन विजयकुमार सर्जे,
रा.शाहु नगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक प्रशासन अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन),
जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.खरसाडे पी.आर., कनिष्ठ प्रशासन अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.तुकाराम भालके उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०९.२०२४ | यांत्रिकी उपविभागाने दि.०१.०४.२०२२ ते दि.३१.०३.२०२३ पर्यंत आपल्या विभागाकडे स्थायी समितीकडे ठेवलेल्या व मंजुर केलेल्या विषयाची छायांकित प्रत मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात, नमूद कालावधीमध्ये स्थायी समितीकडे कुठल्याही ठरावासाठी विषय सादर करण्यात आलेला नसल्यामुळे माहिती निरंक आहे. ही बाब अपिलार्थी यांना दि.०१.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयाव्दारे निर्देशित केलेली माहिती (८१ पृष्ठे) दि.१०.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, अपिलार्थी यांचे प्रथम अपील अंशत: मान्य करुन आठ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे

प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18830 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ७२२/२०२५**
**बोर्ड क्र.१३**

श्री.सचिन विजयकुमार सर्जे,
रा.शाहु नगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, देवळाली, ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
केंद्र प्रमुख,
केंद्रीय प्राथमिक शाळा, रुईभर, ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०७.२०२४ | सन २०२२ ते आजतागायत, शाळेच्या स्वच्छतेसाठी किती निधी आला, पाण्याची व्यवस्था, मुलांना खेळण्याची व्यवस्था, वृक्षारोपणसाठी किती निधी जि.प.कडुन येतो, शाळेच्या परिसरामध्ये किती झाडे लावले व ते संगोपन कसे केले जाते, आपल्या शाळेत अत्यावश्यक सुविधा त्यासाठी कोणती काळजी घेता, आजतागायत आपल्या शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कशी केली त्याची दफ्तरी नोंद काय झाली, तसेच मुलांना व मुलींना बाथरुमची सोय कशी केली आहे याची सविस्तर माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणीचे इतिवृत्त देण्यात आले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असुन अशा स्वरुपातील माहितीचा, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18838 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ७२३/२०२५**
**बोर्ड क्र.१४**

श्री.सचिन विजयकुमार सर्जे,
रा.शाहु नगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कृषि अधिकारी,
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, श्री.ए.पी.काळे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०९.२०२४ | यांत्रिकी उपविभाग जिल्हा परिषद धाराशिव यांनी दि.२५.०१.२०२४ व दि.२७.०१.२०२४ रोजी अनुक्रमे गेट पास क्र.१३२२ (RIV२४०५) व गेट पास क्र.१३२४ (RIV २४०७) अन्वये वितरित केलेल्या विद्युत पंपाचे उभारणी अहवाल व नमुना नं.३३ साठी नोंदवहीची छायांकित प्रत मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रस्तुत व्दितीय अपिलाची आयोगासमोरील सुनावणीची नोटीस कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर माहिती अर्जाच्या अनुषंगाने माहितीचे अपिलार्थीस प्रदान झाले असल्याची बाब निदर्शनास आली नसल्यामुळे सदर अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली जवळजवळ ८४ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस दि.२२.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, सुनावणीनंतर फीस भरणा करण्याचे पत्र पाठविले, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी

सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18836 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७२४/२०२५**
**बोर्ड क्र.१५**

श्री.सचिन विजयकुमार सर्जे, — अपिलार्थी
रा.शाहु नगर, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी,
लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०९.२०२४ | यांत्रिकी उपविभागाने दि.०१.०४.२०२२ ते ३१.०३.२०२३ पर्यंत आपल्या विभागाकडे जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीकडे ठेवलेल्या व मंजुर केलेल्या विषयाची छायांकित प्रत मिळणेबाबत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०१.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. मात्र सदर प्रथम निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे जिल्हा परिषद, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 18835 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७२६/२०२५**
**बोर्ड क्र.१६**

श्री.सचिन विजयकुमार सर्जे, — अपिलार्थी
रा.शाहु नगर, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,
आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ.विजयशील कुलकर्णी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.११.२०२४ | १.राष्ट्रीय आरोग्य अभियान (एनएचआरएम) च्या कंत्राटी भरतीमध्ये घेण्यात आलेल्या लॅब टेक्निशन, एक्स रे टेक्निशियन, ई.सी.जी. टेक्निशियन व सिटी स्कॅन टेक्निशन निवड केलेल्या उमेदवाराची कागदपत्राची संपूर्ण संचिका, २. त्यांची निवड यादी व प्रतिक्षा यादी देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, उमेदवाराचे अर्ज व्यापक जनहिताशी संबंधित नसल्यामुळे ते दि.१७.१०.२०१४ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार देय होणार नसल्याचा निष्कर्ष काढुन उर्वरित माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.३०.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अभिलेखात उपलब्ध असलेली व देय होणारी माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18834 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७२८, १७२९ व १७३०/२०२५ (०३)**

श्री.सचिन विजयकुमार सर्जे,
रा.शाहु नगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
उपअभियंता (यां) यांचे कार्यालय,
यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअभियंता (यां),
यांत्रिकी उपविभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, श्री.एस.पी.शिंदे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १८ | १२.११.२०२४ | जिल्हा वार्षिक योजनेमधील अखर्चित निधीमधील खरेदी केलेल्या ३ नग थ्री फेज व ६० नग सिंगल फेज खरेदी केलेल्या पंप सेंटरची संपूर्ण संचिका मिळणेबाबत, |
| १९ | ०५.११.२०२४ | आपल्या कार्यशाळेमध्ये सध्या जुने वाहने पडुन असलेल्या वाहनाचे आरसी बुक, वाहनाचे मूळ कार्यालय, वाहनाचे नंबर, वाहनाचे आजतागायत झालेले रनिंग (किमी), |
| २० | ०५.११.२०२४ | यांत्रिकी उपविभाग यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी / कर्मचारी माहे जुलै २०२२, २०२३ व जुलै २०२४ या महिन्यातील पगार पत्रकाची छायांकित प्रत मिळण्याबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे. अपिलार्थी यांचे माहिती अर्ज ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव या कार्यालयाकडुन यांत्रिकी उपविभागास हस्तांतरित झालेले आहेत. सदर माहिती अर्ज दि.२६.११.२०२४ रोजी यांत्रिकी उपविभागास प्राप्त झालेले आहेत. सदर प्राप्त झालेल्या बोर्ड क्र.१८ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती निरंक असल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तसेच बोर्ड क्र.१९ मधील अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात दि.०३.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीच्या रु.३०/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी शुल्काचा भरणा केला नसल्यामुळे माहिती देण्यात आलेली नाही. तसेच बोर्ड क्र.२० मधील माहिती अर्जाव्दारे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे व या माहितीमध्ये

जनहित नसल्यामुळे सदर माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहिती व्यक्तिश: हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता किंवा माहिती अर्जावरील घडामोडी ज्ञात करुन घेण्याकरिता कार्यालयाकडे व्यक्तिश: संपर्क केलेला नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18832 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८३३/२०२५**
**बोर्ड क्र.२४**

श्री.अफसर ईसाक ईनामदार,
रा.उमरगा (चि), ता.तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, उमरगा (चि), ता.तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.इब्राहीम सिलेमान शेख उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०९.२०२४ | मौजे उमरगा चिवरी येथील ग्रामपंचायतला पाणीटंचाईच्या निवारण डिसेंबर २०२३ ते जुलै २०२४ पर्यंत देण्यात आलेल्या वेगवेगळ्या शासकीय योजनेच्या माध्यमातुन देण्यात आलेल्या धनादेशचा तपशिल मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये माहिती व्यक्तिश: हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी करुन त्यांनी माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कार्यालयाकडे व्यक्तिश: संपर्क केलेला नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्या नमूद पत्त्यावर त्यांना व्यक्तिश: उपलब्ध करुन दिली असता त्यांनी माहिती स्विकारली परंतु माहिती स्विकारुन पोच दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केलेल्या कार्यवाहीचा कोणताही पुरावा आयोगाच्या पटलावर सादर केलेला नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, उमरगा (चि), ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध

असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18830 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११३७, ११३८ व ११३९/२०२५ (०३)**

श्री.विजय मारुती क्षीरसागर,
रा.तीर्थ (खुर्द), ता.तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, तीर्थ (खुर्द), ता.तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.धनवे ए.जे. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्रीमती नाईक जे.जी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २५ | ०५.११.२०२४ | ०१ एप्रिल २०२१ ते ०५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत ग्रा.पं. तीर्थ खुर्द ता.तुळजापूर यांना केंद्र, राज्य व इतर संस्था व इतर मार्गे किती रुपयांचा निधी मिळाला, तो कुठे किती खर्च केला, याची सर्व कागदपत्रे मिळणेस विनंती, |
| २६ | ०५.११.२०२४ | ग्रा.पं. तीर्थ खुर्द ला १५ व्या वित्त आयोगाचा किती निधी उपलब्ध झाला, तो कुठे व कोणत्या कामासाठी वापरला गेला याचा व गेल्या तीन वर्षाचा ग्रा.पं. तीर्थ खुर्दचा लेखापरीक्षण अहवालाची छायांकित प्रत मिळावी, |
| २७ | ०९.०९.२०२४ | ग्रा.पं.तीर्थ खुर्द यांना प्राप्त अधिकाराप्रमाणे कर प्रणाली जसे घरपट्टी, पाणीपट्टी, आरोग्य कर याची करवसुली किती केली, ०१ जानेवारी २०२० ते १० सप्टेंबर २०२४, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी

केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असुन ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तीर्थ खुर्द, ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद तीन जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, तीर्थ खुर्द, ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19019 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १३२९/२०२५**
**बोर्ड क्र.२८**

श्री.योगेश बळीराम कानडे,
रा.काक्रंबा, ता.तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, काक्रंबा, ता.तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.कांबळे व्ही.एस. उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०७.२०२४ | सन २०१९-२०, ग्रामपंचायत स्तरावरुन पिण्याच्या पाण्याच्या केलेल्या सोईबाबत, मौ.काक्रंबा, ता.तुळजापूर, जि.धाराशिव येथील बळीराम गंगाराम कानडे यांची ग्रामपंचायतीने अधिग्रहण केलेली बोअर दि.३१.०५.२०१९ रोजी कोणतीही कल्पना न देता बंद केल्यानंतर त्या भागातील लोकासाठी ग्रामपंचायत स्तरावरुन कोणत्या प्रकारे पाण्याची सोय केली याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहिती स्वत:शी संबंधित आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध

करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काक्रंबा, ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18833 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४६० ते १४६८/२०२५ (०९)**

श्री.वैजनाथ शामराव सुरवसे, — अपिलार्थी
रा.मातोश्री ज्युस सेंटर, मलबा हॉस्पिटल शेजारी, भवानी रोड,
तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, गंधोरा, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१५.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये नऊ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.खोपडे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या नऊ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २९ | १९.१२.२०२४ | ग्रामसभा, ग्रामसभेच्या विविध विषयाची, ग्रामसभेची उपस्थिती, ग्रामसभेत घेतलेल्या निर्णयाची, किर्द नोंदीसह अहवालाची, ऑडिटसह माहिती, विकास कामाची माहिती, सदि.०१.०१.२०१९ ते दि.१५.१२.२०२४, |
| ३० | १९.१२.२०२४ | चौदाव्या व पंधराव्या गाव निधी सुधारणा योजनेतील करण्यात आलेल्या संपूर्ण कामाची, इंजिनिअरिंग प्लॅन, किर्द नोंदी अहवाल..इ. माहिती, ०१ जानेवारी ते दि.१५.१२.२०२४, |
| ३१ | १९.१२.२०२४ | ग्रामपंचायतने वसुल केलेली घरपट्टी, नळपट्टी ऑडिटसह, सन २०१९ ते दि.१५.१२.२०२४, |
| ३२ | १९.१२.२०२४ | विविध विकास कामाची, दलित वस्ती, स्मशान भूमि, सिमेंट रस्ता इ.बाबत माहिती, ०१ जानेवारी ते दि.१५.१२.२०२४, |
| ३३ | १९.१२.२०२४ | ग्रामपंचायतच्या विविध विकास कामाच्या अंतर्गत झालेल्या व तयार केलेल्या पाझर तलाव व तलावाचे खोलीकरण ऑडिट, इंजिनिअर प्लॅनसह माहिती, सन २०१९ ते २०२४, |
| ३४ | १९.१२.२०२४ | ग्रामपंचायतच्या विविध विकास कामाच्या अंतर्गत सीसीटीव्ही फुटेजची माहिती, ०१ जानेवारी २०१९ ते दि.१५.१२.२०२४, |

| | | |
|---|---|---|
| ३५ | १९.१२.२०२४ | ग्रामपंचायतीच्या विविध विकास कामाच्या अंतर्गत घेण्यात आलेली मासिक सभा, सभेत मंजुर-नामंजुर केलेला अहवाल, ग्रामपंचायत सदस्य यांची नावासह, सहीसह सही नमुना याची माहिती, दि.०१.०१.२०१९ ते दि.१५.१२.२०२४, |
| ३६ | १९.१२.२०२४ | ग्रामपंचायतच्या विविध विकास कामाची व विकास कामातंर्गत गावात घेण्यात आलेल्या ग्रामसभा व ग्रामसभेच्या विषयाची, उपस्थितीची, ग्रामसभेत घेतलेल्या निर्णयाची व अहवालाची माहिती, |
| ३७ | १९.१२.२०२४ | ग्रामपंचायतच्या विविध विकास कामाचे अंतर्गत करण्यात आलेल्या घरकुल योजनेतंर्गत मंजुर झालेल्या घरकुल सदस्यांची, मान्यतेची, बांधण्यात आलेल्या घरकुलची इंजिनिअरिंग प्लॅनसह, मान्य झालेल्या घरकुल संख्याची माहिती, दि.०१.०१.२०१९ ते दि.१५.१२.२०२४, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची व मोठ्या कालावधीची आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२४.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये एकत्रित प्रतिसाद देऊन, माहितीचे अवलोकन करुन नियमानुसार रु.२/- प्रमाणे माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी अवलोकन करुन आवश्यक नेमकी माहिती प्राप्त करुन घेणेबाबत प्रतिसाद दिलेला नाही. अपिलार्थी यांना माहितीमध्ये स्वारस्य नसुन त्यांनी केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने माहिती अर्ज सादर केलेले आहेत. यापूर्वी अपिलाथी पंचायत समिती तुळजापूर येथे उपोषणास बसले असता त्यांना त्यांच्या मागणीप्रमाणे ग्रामपंचायतीशी संबंधित संपूर्ण माहिती हस्तांतरित करण्यात आलेली असताना त्यांनी परत माहिती अधिकारातंर्गत अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन अशा स्वरुपातील माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित केले असल्याचे दिसुन येत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करणेबाबत प्रतिसाद दिला असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन निदर्शनास येत नाही. तसेच आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. या सर्व बाबी विचारात घेता, अपिलार्थी यांना आयोगासमोरील सुनावणीमध्ये व माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये स्वारस्य असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त नऊ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18831 दिनांक :- 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८६५ ते १८७४/२०२५ (१०)**

श्री.नामदेव मकराम मनसावळे, — अपिलार्थी
रा.खडकी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, खडकी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दहा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.दुधभाते शिवाजी व्यंकट व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.आयतराव चंदर कावळे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दहा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३८ | ०६.०८.२०२४ | मौजे खडकी कार्यालय येथील विविध कामे करण्यासाठी फक्त कामासाठीच घेतलेले मासिक सभा व ग्रामसभा नोटीस रजिस्टर व हजेरी रजिस्टर मिळणे, |
| ३९ | ०६.०८.२०२४ | मौजे खडकी ग्रामपंचायत कार्यालय येथील सर्व योजना पासबुक व ग्रामनिधी पाणी पुरवठा पासबुक किर्द प्रमाणांकित व्हावचर झेरॉक्स प्रत, |
| ४० | ०६.०८.२०२४ | मौजे खडकी ग्रामपंचायत कार्यालय येथील कर मागणी रजिस्टर झेरॉक्स प्रत व करवसुली पावती झेरॉक्स देणे, |
| ४१ | ०६.०८.२०२४ | सन २०२१ ते २०२४, विविध योजनेतुन ग्रामपंचायत कार्यालय खडकीला प्राप्त निधी प्रत्येक निधीतुन घेतलेली कामे, त्या कामाचे प्रशासकीय मंजुरी व तांत्रिक मंजुरी तसेच त्या कामाचे एम.बी. व सी.सी. सत्यप्रत, प्रत्येक कामाचे इस्टीमेट देणे, |
| ४२ | ०६.०८.२०२४ | मौजे खडकी ग्रामपंचायत कार्यालय येथील विविध कामे करण्यासाठी मंजुर ठराव मासिक सभा व ग्रामसभा घेतलेले झेरॉक्स सत्यप्रत, |

| | | |
|---|---|---|
| ४३ | ०६.०८.२०२४ | सन २०२१ ते २०२४, मौजे खडकी ग्रामपंचायत कार्यालय येथील शेतजमीन गट नं.१८ व गट नं.१९ या शेतजमीन गटामध्ये किती घरे आहे, त्यांच्या ग्रामपंचायत नमुना नं.०८ रजिस्टला किती नोंदी आहे आणि सन २०२१ ते २०२४ पर्यंत गावातल्या घरजागेची नवीन नोंदीची माहिती, |
| ४४ | ०६.०८.२०२४ | मौजे खडकी ग्रामपंचायतीचे प्रत्येक वर्षाचे वार्षिक अंदाजपत्रक सत्यप्रत झेरॉक्स, |
| ४५ | ०६.०८.२०२४ | सन २०२१ ते २०२४ पर्यंत मौजे खडकी ग्रामपंचायत कार्यालय येथील सन वार्षिक अहवाल झेरॉक्य प्रत्येक वर्षाप्रमाणे, |
| ४६ | ०६.०८.२०२४ | मौजे खडकी ग्रामपंचायत कार्यालय येथील सन २०२१ ते २०२४ पर्यंतचे शेरे बुक झेरॉक्स, |
| ४७ | ०६.०८.२०२४ | मौजे खडकी ग्रामपंचायत कार्यालय येथील रोजगार हमी (एमआरईजीएस) या योजनेतुन घेण्यात आलेली कामे, त्यावरील काम करणाऱ्या मजुराची यादी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केल्यानंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असुन ती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिशः पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खडकी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद दहा जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, खडकी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी**

आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह दहा व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19020 दिनांक : 31/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २११२४/२०२५**
**बोर्ड क्र.४८**

श्री.सुर्यवंशी वसंत कांबळे, — अपिलार्थी
रा.काटगाव, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, काटगाव, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.घोगरे संजय रामचंद्र व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.आयतराव चंदर कावळे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०१.२०२५ | १. ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत झालेल्या विविध विकास कामाची यादी, २. प्रत्येक कामाच्या संदर्भातील तांत्रिक व प्रशासकीय मान्यता आदेश, ३. प्रत्येक कामाच्या संदर्भातील ग्रा.पं.मासिक बैठकीचा इतिवृत्त, ४. १५ व्या वित्त आयोग एकुण प्राप्त निधी अंतर्गत दलितवस्ती अंतर्गत झालेल्या कामांची यादी, ५. प्रत्येक कामाच्या संदर्भातील ठरावाच्या प्रती, सन २०२३ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारला असुन अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडुन पदभारात अप्राप्त असल्यामुळे सदर अर्जावर कार्यवाही करता आलेली नाही. आयोगाकडील सुनावणी नोटीससोबत अपिलार्थी

यांचा माहिती अर्ज प्राप्त झाला असुन या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची असुन ती एका पेक्षा जास्त विषयाशी निगडित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, काटगाव, ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18850 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २३८१/२०२५**
**बोर्ड क्र.४९**

श्री.शक्ती पांडुरंग पांडागळे,
रा.आपसिंगा, ता.तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, कात्री, ता.तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.नलावडे एस.टी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्रीमती नाईक जे.जी. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| निरंक | ग्रा.पं.कात्री मध्ये सन २०२० ते २०२५ पर्यंत कोणकोणत्या योजनेतंर्गत कोणती कोणती कामे झाली आहेत, त्या प्रत्येक कामाचे बजेट किती होते, ते कोणत्या गुत्तेदारास दिले होते, कोणत्या बेसिक वर दिली होती, सध्या किती कामे पूर्ण झाली आहेत, तसेच किती कामे चालु आहेत, सन २०२० ते २०२५ पर्यंत जी कामे ग्रा.पं. ला आली आहेत त्या सर्व कामाचे इस्टीमेट मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची आहे. त्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता काही कालावधी लागला. सदर एकत्रित / संकलित केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना दि.०५.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पंचासमक्ष नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिलेली माहिती अपूर्ण व असमाधानकारक असल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची असुन अशा स्वरुपातील माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18851 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८७७/२०२५**
**बोर्ड क्र.५०**

श्रीमती शैनाज फिरोज नदाफ, — अपिलार्थी
रा.केसुर, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, होर्टी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी विधीज्ञ श्री.यशवंत शा. पाटील व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.देवानंद लक्ष्मण रेड्डी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०४.२०२५ | घर क्र.५८५, ५८६, ५८९ चे फेर फार झाले असेल तर सर्व ठरावाचे नक्कल, सोबत वारसधाराचे कागदोपत्री झेरॉक्स, आपण केलेल्या ठरावांची नक्कलचे सर्व माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी

केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांचे प्रतिनिधी (विधीज्ञ) यांना देण्यात आली. अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 18852 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३३२७/२०२५**
**बोर्ड क्र.५१**

श्री.संजय महादेवराव सोनवणे,
रा.राजे संभाजी नगर, मोतीझरा विभाग, तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.मनोज उत्तम चौगुले व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्रीमती नाईक जे.जी. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०३.२०२५ | दि.०८.०७.२०२४ रोजी सौ.संगीता लक्ष्मण सुरवसे व श्री.लक्ष्मण भीमा सुरवसे, रा.सारा गौरव जवळ, तुळजापूर यांनी ग्रामसेवक शिंदफळ यांच्याकडे नोंदणी करत पोस्टाने दिलेल्या निवेदनावर / अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या अभिलेखाच्या छायांकित प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कामाच्या व्यापात उपलब्ध करुन देण्याचे राहुन गेलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न

मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, सिंदफळ, ता.तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18853 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६३५/२०२५**
**बोर्ड क्र.५२**

श्री.रमजान बंदुभाई नदाफ, — अपिलार्थी
रा.कुसूर, ता.दक्षिण सोलापूर, जि.सोलापूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, होर्टी, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.देवानंद लक्ष्मण रेड्डी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.आयतराव चंदर कावळे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०४.२०२५ | दि.०१.०१.२०२२ ते आजतागायत, मौजे हार्टी घर क्र.५८५, ५८६, ५८९ चे घर जागेचे उतारे पाठविणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली

माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18854 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ७१६, २५९९ व ३५०२/२०२५ (०३)**

श्री.प्रकाश गणपती सोनार,
रा.जवळे दुमाला, पो.खामगाव, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जवळे (दु), ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ (०१), दि.२४.०६.२०२५ (०१) व दि.२८.०७.२०२५ (०१) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.मेनकुदळे बी.एम. (वर्तमान), श्रीमती डांगे पी.एम. (तत्कालीन) व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५४ | १८.०९.२०२४ | ग्रामपंचायत जवळे दु., ता.जि.धाराशिव येथे शासनाच्या चौदाव्या वित्त आयोगाच्या प्राप्त झालेल्या एकुण निधीमधुन आजपर्यंत अखर्चित ठेवलेली रक्कम किती आहे व ती कोणत्या विकास कामाची रक्कम अखर्चित ठेवली आहे, त्या कामाची माहिती द्यावी, सन २०१६ ते २०२०, |
| ५५ | १४.११.२०२४ | मौजे जवळे दुमाला येथे माहे ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या ग्रामसभेचे प्रोसेडिंग, उपस्थित ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्यासहीत देण्यात यावे, |
| ५६ | २५.०२.२०२५ | सन २०२१ ते २०२४, मौजे जवळे दु. ग्रामपंचायत व्दारा केलेल्या नवीन वाढीव पाणीपट्टी कर आकारण संबंधी ०६ मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. सदर माहिती एकत्रित / संकलित करुन अपिलार्थी यांना देण्याचा प्रयत्न केला असता, अपिलार्थी यांनी सदर माहिती अपूर्ण असल्याचा समज करुन माहिती घेण्यास

नकार दिलेला आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मोघमपणे मागितलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18855 दिनांक : 29/12/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७१७/२०२५**
**बोर्ड क्र.५७**

श्री.सुनिल दशहर काळे,
रा.जवळे दु., पो.खामगाव, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जवळे दु., ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.मेनकुदळे बी.एम. (वर्तमान) व श्रीमती डांगे पी.एम. (तत्कालीन) व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस.उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०९.२०२४ | ग्रामपंचायत जवळे दु., यांना १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त झालेल्या एकुण निधी पैकी आजपर्यंत अखर्चित निधीची रक्कम शिल्लक आहे, तसेच कोणत्या कामाचा निधी शिल्लक आहे याची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती दि.१२.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती नाकारली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली

असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18855 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३२८१/२०२५**
**बोर्ड क्र.५८**

श्री.शेख शरीफ काशिमलाल, — अपिलार्थी
रा.बेंबळी, ता.जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, बेंबळी, ता.जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.केवळराम के.ए. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एम. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०४.२०२५ | गावातील सार्वजनिक विकास, रोड, नाली, अंडर ड्रेनेज, घरकुल व मागासवर्गीयांच्या निधीबाबत सन २०२१ ते २०२५ कालावधीतील माहिती ०६ मुद्यांवर, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज ग्रामपंचायत कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. तथापि सदरचा अर्ज ग्रामपंचायत कर्मचारी यांनी निदर्शनास आणुन दिला नसल्यामुळे या अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२७.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन ती एका पेक्षा जास्त विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, बेंबळी, ता.जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २११६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18856 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १३०८/२०२५**
**बोर्ड क्र.५९**

श्री.चंद्रकांत रंगनाथ गरड, — अपिलार्थी
रा.धुळे सोलापूर रोड, गणपती मंदीर, येडशी, ता.जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, येडशी, ता.जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.जी.एम.भगत (वर्तमान), श्री.एस.आर.पवार (तत्कालीन) व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस.उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०८.२०२४ | ग्रामपंचायत मिळकत क्र.१४०३ चे फेरफार केलेबाबत ०४ मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना ओदशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार ती अपिलार्थीस देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18858 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १८९६/२०२५**
**बोर्ड क्र.६०**

श्री.गोपाळ हरिबा आदटराव,
रा.करजखेडा, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, करजखेडा, ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०१.२०२५ | १.ग्रामपंचायत कार्यालय करजखेडा दि.०५.०१.२०२३ पासुनचे मासिक सभा, ग्रामसभा, महिला ग्रामसभा, विशेष ग्रामसभेचे प्रोसेडिंग नोटीस, हजर सभासद बुक इ. सत्यप्रत,<br>२. ग्रामपंचायतीचे विविध बँकात असलेल्या खातेचे पासबुक, बँक स्टेटमेंट (१५ वा वित्त आयोग, ग्रामनिधी, दलित वस्ती सुधार, रो.ह.यो. इ.) सर्वच खातेचे बँक स्टेटमेंट व किर्द पावत्या व्हावचर इत्यादी देणे,<br>३. सर्व कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका बील, वार्षिक प्रशासन अहवाल, वार्षिक अंदाजपत्रक आराखडा, बाजार लिलावाचे फाईल्स, मासिक जमा खर्च, वार्षिक जमा खर्च, १५ वा वित्त आयोग जमाखर्च इ., दलित वस्ती सुधार जमा खर्च, रो.ह.यो. जमा खर्च इत्यादी माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे ०७ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांन माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिशः पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन ती एका पेक्षा जास्त विषयाशी संबंधित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, करजखेडा, ता.जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 18889 दिनांक :- 29/12/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २४७७/२०२५**
**बोर्ड क्र.६१**

श्री.श्रीकांत रमाकांत हाजगुडे, — अपिलार्थी
रा.रामवाडी, ता.जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, रामवाडी, ता.जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी विधीज्ञ श्री.संभाजी एस.वाकुरे, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्रीमती डी.व्ही.मोहिते व प्रथम अपिलीय अधिकारी विस्तार अधिकारी (पं), श्री.भांगे एस.ए. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.१२.२०२४ | सन २०२० ते २०२४, १. रजिस्टर नमुना नं.०१ ते ३३ ची छायांकित प्रत मिळणे, २. १४ व १५ व्या वित्त आयोगाच्या विकास कामाची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती एकत्रित / संकलित करुन ती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न

दिल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 18860 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५७३/२०२५**
**बोर्ड क्र.६२**

श्रीमती उषाबाई सत्यवान ढवळे,
रा.बरमगाव बु., पो.रुईभर, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, बरमगाव बु., ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.पाटील अश्विनीकुमार आण्णा व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री.ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३१.०१.२०२५ | गाव पाणी पुरवठा, विहीरीचे कागदपत्रे बाबत माहिती, सन १९९९ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे या अर्जाच्या अनुषंगाने कोणतेही कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे या अर्जाच्या अनुषंगाने सुनावणी घेऊन निर्णय पारित करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केलेल्या बाबीच्या अनुषंगाने, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना त्या सोबत सादर केलेल्या माहिती व प्रथम अपील अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती व प्रथम अपील अर्ज सादर केल्याबाबत कार्यालयाची पोच अथवा पोस्टाची पावती सोबत सादर केलेली नाही. ही बाब विचारात घेता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आज रोजी

आयोगासमोर केलेल्या त्यांच्या युक्तिवादामध्ये आयोगास तथ्यांश दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18861 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३७४४/२०२५**
**बोर्ड क्र.६३**

श्री.सुनिल अशोक पाटील,
रा.शिवाजीनगर, येडशी, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, येडशी, ता.जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.भगत जी.एम. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा ढाकणे एस.एस. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०५.२०२५ | दि.०१.०१.२०२३ ते दि.३१.०३.२०२५, मासिक सभा / ग्रामसभा / महिला ग्रामसभा मधील झालेल्या सर्व ठरावाच्या / विषयाच्या प्रोसेडिंगच्या प्रती व किर्द खतावणी आणि व्हावचर बुक च्या प्रती मिळण्याबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे सदर माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना दि.१२.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सुचित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी अवलोकन करुन माहिती घेण्याऐवजी संपूर्ण माहिती मिळावी अशी विनंती केली. त्यानुसार दि.०८.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे दि.१३.०८.२०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, १० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18862 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ११३/२०२५**
**बोर्ड क्र.६४**

श्री.सयाजी रामराव साठे,
रा.भोयरे, पो.नरखेड, ता.माहोळ, जि.सोलापूर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अभियंता श्रेणी-०१,
कृष्णा मराठवाडा बांधकाम उपविभाग क्र.०६, तुळजापूर,
ता.तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.०१, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०८.२०२४ | सन २०१७ ते ०१ ऑगस्ट २०२४ या कालावधीतील कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना क्र.०२ टप्पा क्र.१ भोयरे भुसंपादनाबाबतची ०९ मुद्यांवर माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीसाठी कोणीही उपस्थित नाहीत. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे कागदपत्रावरुन दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही जन माहिती अधिकारी तुळजापूर यांनी माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, कृष्णा मराठवाडा बांधकाम उपविभाग क्र.०६, तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस

दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.०१, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18863 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७६१ ते २७६५/२०२५ (०५)**

श्री.मनिष भगवानदास अग्रवाल,
रा.प्लॉट नं.ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.०१, सिंचन भवन,
आनंदनगर, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.०१, सिंचन भवन,
आनंदनगर, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, श्री.रोहन अरुण पवार (तत्कालीन) उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६५ | २०.०२.२०२५ | डी.ओ. ची माहिती शुल्कची माहिती, दि.०१.०४.२०२३ ते दि.२०.०२.२०२५, विषयाप्रमाणे किंवा शासन विहित नमुन्यात किंवा कार्यालयात उपलब्धतेनुसार किंवा पुढील प्रमाणे - आपल्या विभागास शासनाने, महामंडळाने, मुख्य अभियंता, प्रादेशिक कार्यालयाने व अधीक्षक अभियंता, मंडळ कार्यालयाने दिलेल्या डी.ओ. पत्राची व यानुसार आपल्या विभागाने सादर केलेल्या खुलासा पत्राची छायांकित प्रती कार्यालयीन पत्रासह कार्यालयाच्या शिक्क्यासह माहिती, |
| ६६ | २०.०२.२०२५ | माहिती अधिकार २००५ चे माहिती शुल्कची माहिती, दि.०१.०४.२०२३ ते दि.२०.०२.२०२५, विषयाप्रमाणे किंवा शासन विहित नमुन्यात किंवा कार्यालयात उपलब्धतेनुसार किंवा पुढील प्रमाणे - आपल्या विभागामार्फत अर्जदारास माहिती अधिकारात माहितीचे शुल्क भरणा करण्याचे दिलेले पत्र, अर्जदाराने भरणा केलेले शुल्कची पावती व सदर रक्कम शासकीय कोषागारात भरणा केलेल्या चलनाची छायांकित प्रती कार्यालयीन पत्रासह कार्यालयाच्या शिक्क्यासह माहिती, |

| | | |
|---|---|---|
| ६७ | २०.०२.२०२५ | माहिती अधिकार २००५ चे मासिक तपशिल, विवरणाची माहिती, दि.०१.०४.२०२३ ते दि.२०.०२.२०२५, विषयाप्रमाणे किंवा शासन विहित नमुन्यात किंवा कार्यालयात उपलब्धतेनुसार किंवा पुढील प्रमाणे - आपल्या विभागामार्फत मंडळ कार्यालयाकडे पाठविलेल्या माहिती अधिकार २००५ चे मासिक तपशिल, विवरणाची छायांकित प्रती कार्यालयीन पत्रासह कार्यालयाच्या शिक्क्यासह माहिती, |
| ६८ | २०.०२.२०२५ | कार्यारंभ आदेश बी-१ रजिस्टरची माहिती, दि.०१.०४.२०२३ ते दि.२०.०२.२०२५, विषयाप्रमाणे किंवा शासन विहित नमुन्यात किंवा कार्यालयात उपलब्धतेनुसार किंवा पुढील प्रमाणे - आपल्या विभागामार्फत कामाचे दिलेल्या कार्यारंभ आदेश बी-१ आदेश रजिस्टरची छायांकित प्रती कार्यालयीन पत्रासह कार्यालयाच्या शिक्क्यासह माहिती, |
| ६९ | २०.०२.२०२५ | देयकाच्या मेमो ऑफ चेकड्रॉन रजिस्टरची माहिती, दि.०१.०४.२०२३ ते दि.२०.०२.२०२५, विषयाप्रमाणे किंवा शासन विहित नमुन्यात किंवा कार्यालयात उपलब्धतेनुसार किंवा पुढील प्रमाणे - आपल्या विभागामार्फत कामाचे व पुरवठाचे देण्यात आलेले धनादेश किंवा आरटीजीएस प्रणालीने एकत्रित बँकेला धनादेश दिले असतील तर सदर यादीसह मेमो ऑफ चेकड्रॉन रजिस्टरची छायांकित प्रती कार्यालयीन शिक्क्यासह माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अधिनस्त विविध संकलनाशी संबंधित असुन माहितीचे स्वरुप विस्तृत व व्यापक आहे. तसेच काही माहिती ही त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागला.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१, सिंचन भवन, आनंदनगर, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. कार्यकारी अभियंता, कृष्णा मराठवाडा बांधकाम विभाग क्र.१, सिंचन भवन, आनंदनगर, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18864 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५९/२०२५**
**बोर्ड क्र.७०**

श्री.बाळासाहेब दिंगबर होरे,
रा.श्रीपुर, ता.माळशिरस, जि.सोलापूर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, परंडा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, परंडा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, श्रीमती अनिता बाळासाहेब होरे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०७.२०२४ | सामायिक क्षेत्राचा विमा माझ्या (अर्जदार) संमतीशिवाय भरल्यामुळे २०१५ ते आजपर्यंत खरीप व रब्बी हंगामचा विमा क्लेम उचलला असल्यामुळे, संबंधित शेतकऱ्याने कुठले कागदपत्र अपलोड किंवा जोडलेली व कुठल्या सीएससी सेंटरवरुन विमा भरला आहे, त्याचा आयडी नंबर मिळावा, २०१५ ते आजपर्यंतचे भरलेल्या विमा व सोबत जोडलेली कागदपत्रे यांचा तपशिल मिळावा, प्रत्येक वेळी रब्बी, खरीप व वर्ष जरी बदलले असेल व प्रत्येक वर्षी सीएससी सेंटर बदलले असेल तरी, प्रत्येक वर्षाचा व हंगामावेळी सीएससी सेंटरचा आयडी नंबर मिळावा, विमा भरतेवेळी सोबत जोडलेली कागदपत्रे, सीएससी सेंटरने जोडलेली संपूर्ण संचिका मिळावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

मिळाली नाही, सुनावणी घेण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, परंडा, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, परंडा, जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धाराशिव यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२४.०९.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.कमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-1902 दिनांक :-31-12-2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १७११, १६५८, १६६३ ते १६६५, १६६८ ते १६७२ व १३२२/२०२५ (११)**

श्री.खंडागळे जीवन सुरेश, — अपिलार्थी
रा.शिक्षक सोसायटी, कुर्डुवाडी, परंडा, ता.परंडा, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, — : उत्तरवादी क्र.१
शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालय, परंडा, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य,
शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालय, परंडा, जि.धाराशिव

(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२५ (०१), दि.०१.०४.२०२५ (०१), दि.२८.०४.२०२५ (०९) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये अकरा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.मोहित आर.देशमुख, अधिवक्ता उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या अकरा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७१ | ०८.०३.२०२५ | १.सन २०२३ ते २०२५ वर्षात आयोजित केलेल्या फायर मॉक ड्रिल्स कवायती त्याबाबतची माहिती, २. फायर संबंधित कोणती सिस्टम आहे, असेल तर कोणाची एनओसी घेण्यात आली, ३. आग लागल्यास त्याबाबत वापरण्यात येणारी यंत्रणा त्याबाबत संपूर्ण तपशिल, |
| ७२ | ०३.०३.२०२५ | सन २०२३ ते २०२५ पर्यंत कायम सेवेत असणाऱ्या कर्मचारी यांचा गोपनीय अहवालाची सत्यप्रत व एलएमसी बैठक ठराव याची छायांकित प्रत, |
| ७३ | १४.०२.२०२५ | सहसंचालक उच्च शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालय अंतर्गत असणारे श्री.भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव व्दारा संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालय परंडा मार्फत २००९ ते २०११ मध्ये प्रयोगशाळा सहायक व प्रयोगशाळा परिचर आलेल्या अर्जदाराचे अर्ज व निवड केलेल्या उमेदवारांची शैक्षणिक पात्रतेसह छायांकित प्रती, |
| ७४ | १४.०२.२०२५ | सहसंचालक उच्च शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालय अंतर्गत असणारे श्री.भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव व्दारा संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालयात ०१.०१.२००९ पासुन ते ३१.१२.२०१४ पर्यंत, गट क व गट ड पद भरती संस्थेमार्फत करण्यात येण्याबाबतचा शासन निर्णय छायांकित प्रत |

| | | |
|---|---|---|
| | | मिळण्याबाबत, |
| ७५ | ०७.१२.२०२४ | शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालयात दि.०१.०१.२००९ ते ३१.१२.२०१४ गट क व गट ड यांच्या एलएमसी कमिटी मार्फतचा पदभरती ठराव सत्यप्रत, दि.०१.०१.२००९ ते ३१.१२.२०१४ गट क व गट ड या कालावधीत भरलेली रिक्त पदाचा बिंदु रोष्टर, |
| ७६ | १४.०२.२०२५ | सहसंचालक उच्च शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालय अंतर्गत असणारे श्री.भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव व्दारा संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालयात दि.०१.०१.२००९ पासुन ते ३१.१२.२०२४ या कालावधीत संस्थेच्या सर्व साधारण सभेच्या बैठकीचे इतिवृत्त झेरॉक्स, |
| ७७ | १४.०२.२०२५ | सहसंचालक उच्च शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालय अंतर्गत असणारे श्री.भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव व्दारा संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालयात दि.०१.०१.२००९ पासुन ते ३१.१२.२०२४ पर्यंतचे आवक रजिस्टर व जावक रजिस्टरच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत, |
| ७८ | ०८.०३.२०२५ | ०१ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ पर्यंत सीसीटीव्ही फुटेज, |
| ७९ | १४.०२.२०२५ | सहसंचालक उच्च शिक्षण विभाग छत्रपती संभाजीनगर कार्यालय अंतर्गत असणारे श्री.भवानी शिक्षण प्रसारक मंडळ धाराशिव व्दारा संचलित शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालयातील दिव्यांग बिंदु नियमावली छायांकित प्रत मिळण्याबाबत, |
| ८० | २८.०२.२०२५ | गट अ व गट ब मधील असणारे शिक्षक, प्राध्यापक, प्राचार्य यांचे हमी पत्र, सन २०१५ ते २०२५ पर्यंत, |
| ८१ | १७.१०.२०२४ | दिव्यांग कर्मचारीबाबत, १. शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालयात सन २००९ ते २०१४ पर्यंत कार्यरत असणारे दिव्यांग कर्मचाऱ्यांचे नाव याबाबतीत संपूर्ण तपशिल, २. शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.गे.शिंदे महाविद्यालयात सन २००९ ते २०१४ पर्यंत असणारे कर्मचारी यांचे वय, नावे, शैक्षणिक पात्रता, बिंदु रोस्टर याचा संपूर्ण तपशिल, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, ज्या महाविद्यालयाकडे माहिती अधिकारांतर्गत अर्ज करुन माहिती मागितलेली आहे त्या महाविद्यालयाचा मी (अपिलार्थी) विद्यार्थी असुन माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर महाविद्यालयात होत असलेल्या अनियमितेबाबत दाद मागण्याकरिता सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी केवळ त्रास देण्याच्या भूमिकेतुन माहिती अर्ज सादर केलेले आहेत. सदर अर्जाव्दारे त्यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची असुन काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे तर काही माहिती गोपनीय स्वरुपाची आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीशी अपिलार्थी यांचा अर्थाअर्थी महाविद्यालयाचे विद्यार्थी या नात्याने काहीही संबंध नाही. या परिस्थितीत, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन काही माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. विस्तृत स्वरुपातील माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत. तसेच त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकेतच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीमध्ये जनहित दिसुन येत

नसल्यामुळे अशी माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) नुसार देय होणार नाही.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त अकरा व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18860 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७९२/२०२५**
**बोर्ड क्र.८१**

श्री.मृत्युंजय वि.कुलकर्णी, — अपिलार्थी
रा.एफ-१५७/०७, स्वामी विवेकानंद नगर, रामटेकडी, पीडब्लू बस स्टॉप जवळ, हडपसर, पुणे

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
रचना सहायक,
सहायक संचालक, नगर रचना विभाग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, खोली क्र.२६, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहायक संचालक,
नगर रचना विभाग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, खोली क्र.२६, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, श्री.अजित बाळासाहेब कुपकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, श्री.हणमंत औदुंबर मारनूर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.१०.२०२४ | माहिती अधिकार कायदा २००५ कलम ३ अन्वये मागितलेली माहिती तत्कालीन मा.नगर रचनाकार / सहायक संचालक, नगर रचना यांना रेखांकनाची छाननी / तपासणी करण्याचे अधिकार कोणत्या कायद्यान्वये व त्या कायद्याच्या कोणत्या कलमान्वये बहाल केले आहेत याबाबत १० मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२३.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ती पुरविणे अपेक्षित नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, निर्णय दिला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.०२.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18866 दिनांक : 29/12/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६३६/२०२५**
**बोर्ड क्र.८२**

श्री.अमोल हरिश्चंद्र फरताडे,
रा.तेरखेडा, ता.वाशी, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
रचना सहायक,
सहायक संचालक, नगर रचना विभाग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, खोली क्र.०७, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक संचालक,
नगर रचना विभाग, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तळ मजला, खोली क्र.२६, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, श्री.अक्षय दिपक पोतदार व प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगर रचनाकार, श्री.हणमंत औदुंबर मारनूर उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०७.२०२५ | तेरखेडा येथील गट क्र.१३६७ व १३६८ मधील मंजुर रेखांकनात २५० चौ.मी. क्षेत्र ॲमेनिटी जागेसाठी राखीव आहे त्या क्षेत्रामध्ये वाणिज्य अकृषी मध्ये बदल करता येईल का याबाबत स्पष्ट असा अभिप्राय मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी चुकीच्या पध्दतीने कलम लागू करुन माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२१.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये

प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याने ती कलम २ (च) मधील माहितीच्या व्याख्येत बसत नसल्याने माहिती देणे शक्य नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१२.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती चुकीच्या पध्दतीने कलम लागु करुन देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१२.०९.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 18867 दिनांक :- 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६९६/२०२५**
**बोर्ड क्र.८३**

श्री.विकास जगन बनसोडे, — अपिलार्थी
रा.सुर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर मार्ग, अंजिठा नगर, धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्री.प्रशांतराव वसंतराव साळी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत. तसेच अपिलार्थी यांच्यावतीने त्यांचे प्रतिनिधी म्हणून ॲड.पी.व्ही.साळवे यांनी आयोगाकडील रोजनाम्यावर स्वाक्षरी करुन प्रत्यक्षात ते सुनावणीकरिता अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०७.२०२५ | आक्टोबर २०२४ पासुन आज रोजी पर्यंत, आपल्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील वाहन नोंदणी व तपासणी तसेच अनुज्ञाप्ती धारकांची माहिती ०७ मुद्यांवर, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे संनिग्ध स्वरुपाची माहिती मोघमपणे मागितलेली आहे. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन, दि.१७.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व अभिलेखात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूरी व दिशाभूल करणारी माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी

त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 18868 दिनांक :- 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७६८/२०२५**
**बोर्ड क्र.८४**

श्री.संजय महादेवराव सोनवणे, — अपिलार्थी
रा.राजे संभाजी नगर, मोतीझरा विभाग, तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.३०.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्री. प्रशांतराव वसंतराव साळी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०४.२०२५ | HSRP नंबर प्लेट संदर्भात ०७ मुद्यांवर माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडुन माहिती अधिकार कायद्यातील कलमांचे उल्लघंन झालेले आहे. सदर माहितीची परिपूर्ण स्वरुपात आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे संनिग्ध स्वरुपाची माहिती मोघमपणे मागितलेली आहे. तथापि अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन, दि.२८.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व अभिलेखात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कलम ६ (१), ६ (३) नुसार पालन न झाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 18869 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७२७/२०२५
बोर्ड क्र.८५

श्री.ब्रम्हदेव सुर्यभान निरपळ,
रा.मागेवाडी, ता.भूम, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
बाल विकास प्रकल्प अधिकारी,
भूम, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी,
धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी विधीज्ञ, श्री.पी.व्ही.जगताप उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०६.२०२५ | १. पोषण आहाराचे वितरण व खर्च, दिल्या जाणाऱ्या आहाराचा प्रकार, प्रमाण व मेनु आणि आहारासाठी आलेला निधी व त्याचा तपशिल, २. योजना व निधीचा तपशिल, केंद्र व राज्य सरकारकडुन मिळालेला निधी आणि त्या निधीचा वापर कोणत्या योजनेसाठी कसा व कुठे केला आहे त्याचा छायांकित प्रतीत अहवाल, ३. कामाचे तास व कर्तव्ये, सेविकेच्या कामाचे वेळापत्रक काय आहे आणि कोणत्या जबाबदाऱ्या अधिकृत आहेत व कोणत्या ऐच्छिक, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. तसेच या प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न

दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, भूम, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी, भूम, जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. जिल्हा महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी, धाराशिव यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.३०.०७.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास, छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र.- 19022 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास, छत्रपती संभाजीनगर विभाग, खोकडपुरा, पैठण गेट, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २५७२/२०२५**
**बोर्ड क्र.८७**

श्री.सुभाष गणपती कदम,
रा.पनवाडी, पो.तेर, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
खोली क्र.५२, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.रविकिरण दयानंद शिंदे, हिशोबनिस, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.ए.एम.शेंदारकर, सहायक निबंधक (प्र) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.१२.२०२४ | सन १९९८ ते १२ डिसेंबर २०२४, चंद्रभागा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., उस्मानाबाद या संस्थेबाबतची माहिती ०७ मुद्यांवर |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलाथी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली बहुतांश माहिती संबंधित चंद्रभागा सहकारी गृहनिर्माण संस्थेशी संबंधित असुन मागणी केलेली माहिती सहायक निबंधक यांच्या कार्यालयाच्या कार्यालयीन अभिलेखाचा भाग नसल्यामुळे दि.२४.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी संबंधित संस्थेकडे वर्ग केलेला आहे. तसेच जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे जसे ऑडिट रिपोर्ट व संस्थेची अ संचिका, अशी माहिती अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर माहिती मिळाल्याचे अपिलार्थी यांनी प्रथम अपील सुनावणीदरम्यान मान्य केल्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०३.२०२५ रोजीच्या निर्णयाव्दारे अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने असेही नमूद करण्यात येत आहे की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज संबंधित संस्थेकडे वर्ग केला असता सदर संस्थेच्या अध्यक्ष यांनी त्यांच्या दि.०३.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयास असे कळविलेले आहे की, अपिलार्थी यांचा संस्थेही काहीही संबंध नाही, सदर व्यक्ती (अपिलार्थी) संस्थेवर दबाव आणुन त्यांचे वैयक्तिक वाद न्यायालयात प्रलंबित असल्याने वैयक्तिक वादातुन अर्ज दाखल केला असल्यामुळे तो विचारात घेण्यात येऊ नये, असे संस्थेचे मत आहे, सदर व्यक्ती आर्थिक लाभापोटी विनाकारण संस्थेवर दबाब आणुन वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात संस्थेच्या विरोधात खोट्या तक्रारी करत असुन मागील एक वर्षापासुन खोटे अर्ज सादर करुन संस्थेला त्रास देण्याचे व ब्लॅकमेलींग करण्याचे काम चालू आहे, सदर व्यक्ती संस्थेचे ओपन स्पेसचे बनावट कागदपत्र / नकाशे तयार करुन हडप करण्याच्या दुष्ट हेतुने त्रास देत आहेत.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्याचे व अपिलार्थी यांनी तसे माहिती मिळाली असल्याचे सुनावणीदरम्यान मान्य केले असल्याचे नमूद करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांचा असा निर्णय या प्रकरणी कायम करुन विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे. या प्रकरणी जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे त्या माहितीचे अपिलार्थीस प्रदान झालेले आहे. मात्र जी माहिती कार्यालयात उपलब्ध नाही किंवा कार्यालयाच्या अभिलेखाचा भाग नाही ती माहिती देता येणे शक्य होणार नाही. तसेच जी माहिती संस्थेशी संबंधित आहे त्या माहितीकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३२ नुसार संस्थेचे सभासद या नात्याने माहितीची मागणी करण्याचा पर्याय उपलब्ध आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद, अधिनियमातील तरतुदी, तसेच आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी केलेला युक्तिवाद या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०३.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 18826 दिनांक :- 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८६४/२०२५**
**बोर्ड क्र.८८**

श्रीमती चंद्रकला किसनराव पाटील व इतर, — अपिलार्थी
रा.दर्गा रोड, नवीन पोस्ट ऑफिस, परंडा, ता.परंडा जि.धाराशिव

**विरुध्द**

१ अवसायक, — : उत्तरवादी क्र.१
उस्मानाबाद जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशीय वि. बँक मर्यादित, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, खोली क्र.५२, धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल, अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री. ए.एम.शेंदारकर, सहायक निबंधक (प्र) उपस्थित आहेत. संबंधित संस्थेचे व्यवस्थापक अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार संबंधित संस्थेचे अवसायक यांचेकडे कलम ६ (१) अन्वये दि.२५.०३.२०२५ रोजीच्या माहिती अर्जाव्दारे संबंधित संस्थेच्या संदर्भात काही माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२४.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित बँकेची नोंदणी रद्द झाली असल्यामुळे सदर बँकेचे कोणतेही कायदेशीर अस्तित्व राहिले नसल्याचे कळविलेले आहे. तथापि त्यांनी कळविलेली बाब चुकीची असुन आज रोजी संबंधित बँक सुरु असुन कामकाज देखील चालु आहे. आमच्यावर झालेल्या अन्यायाविरुध्द सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागण्याकरिता माहितीची आवश्यकता आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे ज्या बँकेकडे माहिती मागितलेली आहे त्या बँकेची नोंदणी रद्द करण्यात आलेली असुन आज रोजी सदर बँकेचे कोणतेही कायदेशीर अस्तित्व राहिलेले नाही. सदर बँकेची नोंदणी रद्द झाली असल्यामुळे अपिलार्थी यांनी ज्यांना उद्देशुन माहिती अर्ज सादर ते अवसायक हे पद देखील अस्तित्वात राहिलेले नाही. सदर बाब अपिलार्थी यांना दि.२४.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे. वास्तविक बँकेची नोंदणीच रद्द झाली असल्यामुळे सदर बँकेस जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी हे पदही अस्तित्वात राहिलेले नाही. या परिस्थितीत अपिलार्थी यांचे आज रोजीचे विचाराधिन व्दितीय अपील फेटाळण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केलेल्या बाबी विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे. प्रसंगावशात, माहितीची मागणी करण्यामागे अपिलार्थी यांची काही प्रशासकीय स्वरुपाची तक्रार असल्याचे त्यांच्या युक्तिवादावरुन दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्या बाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १८८२/ दिनांक : २९/१२/२०२५

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६४७/२०२५**
**बोर्ड क्र.८९**

श्री.भिका सुदामराव विद्यागर, — अपिलार्थी
रा.नेताजी गोरे (माळी), म.फुले सभागृहाजवळ, तांबरी विभाग, धाराशिव

**विरुध्द**

१ क्रांतीवीर लघु उद्योग व कुटीर उद्योग सहकारी पतसंस्था मर्या., धाराशिव : उत्तरवादी क्र.१

२ क्रांतीवीर लघु उद्योग व कुटीर उद्योग सहकारी पतसंस्था मर्या., धाराशिव : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०१.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. संबंधित सहकारी पतसंस्थेच्या वतीने कोणीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार संबंधित सहकारी पतसंस्थेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०५.२०२५ | शोभा भिकाजी विद्यागर यांनी आपल्या पतसंस्थेमध्ये बचत खाते उघडताना दिलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे संबंधित पतसंस्थेस आदेशित करण्यात यावे. संबंधित पतसंस्थेकडे अनेकदा माहिती मागितली. मात्र माहिती अधिकार कायदा लागू होत नसल्याची सबब पुढे करुन संबंधित पतसंस्थेने माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. संबंधित पतसंस्थेच्या संदर्भात जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले असता त्यांनी, संबंधित पतसंस्थेच्या बाबतीत ते अपिलीय अधिकारी नसल्याचे कळविलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, नोंदणीकृत सहकारी संस्थांना जरी माहिती अधिकार कायदा लागू होत नसला तरी अशा सर्व सहकारी संस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा (MCS Act) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ यातील नियम ६५ अन्वये प्रत्येक वर्षी संस्थेच्या संदर्भातील माहिती संबंधित निबंधक कार्यालयात दाखल करणे हे बंधनकारक आहे. तसेच नियम ७९ (२) यात निबंधक कार्यालय यांना कलम

७९ (१) आणि १ (A) यात दाखल करावयाची माहिती सादर न केल्यास सक्त निर्देश देण्याचे अधिकार सुध्दा नमूद केले आहेत. नियम ६५ अन्वये प्रत्येक सहकारी संस्थेने लेखापुस्तक व सहकारी कायद्या अंतर्गत बंधनकारक असलेली सहकारी संस्थेने केलेले वार्षिक गतीविधी संबंधित माहिती देणे आवश्यक आहे. वरील माहिती ही निबंधक कार्यालयात प्रतिवर्षी दाखल करणे सहकारी संस्थांना कायद्याने बंधनकारक असल्याचे मा.उच्च न्यायालय यांनी त्यांच्या निर्णयात सर्व निबंधक, उपनिबंधक, सह निबंधक कार्यालयास वेळोवेळी निर्देशित केलेले आहे. त्यांच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत सहकारी संस्थांनी दाखल केलेल्या अशा माहितीतुन अर्जदार यांनी दाखल केलेल्या जोडपत्र अ च्या अनुषंगाने माहिती उपलब्ध असल्यास माहिती प्रदान करावी व ही जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आलेली आहे. तसेच कलम १९ (क) नुसार संस्थांनी निबंधक कार्यालयास सादर करावयाची माहिती दाखल केली नसल्यास अशी माहिती संबंधित संस्थेकडुन प्राप्त करुन घेऊन ती अर्जदार यांना पुरविणे देखील नियमाने बंधनकारक केलेले आहे. **मात्र यातील त्रयस्थपक्षाशी संबंधित अथवा कोणाच्या खाजगीपणाचे हक्कावर गदा आणणारी माहिती देणे कलम ८ (१) नुसार बंधनकारक नाही. अशी माहिती देण्यास संबंधित निबंधक कार्यालय नकार देऊ शकतात.**

वरील सर्व बाबी विचारात घेता, संबंधित क्रांतीवीर लघु उद्योग व कुटीर उद्योग सहकारी पतसंस्था मर्या., धाराशिव यांनी निबंधक कार्यालयात सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागितलेली माहिती ही जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांच्या अभिलेखात असल्यास अशी माहिती अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन सहायक निबंधक (प्रशासन), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांनी कलम ७ (६) नुसार अपिलार्थीस ३० दिवसात विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे अपिलार्थी यांना वस्तुस्थितीसह स्पष्टपणे कळविण्यात यावे, या निष्कर्षाप्रत येऊन विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २११३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18872 दिनांक : 29/12/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

१. सहायक निबंधक (प्रशासन), जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७७७/२०२५
बोर्ड क्र.१०

श्री.सोमनाथ दादाराव डाके,
रा.तांबरी विभाग, बार्शी नाका, धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक निबंधक,
सहकारी संस्था, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
खोली क्र.५२, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.रविकिरण दयानंद शिंदे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.ए.एम.शेदारकर, सहायक निबंधक (प्र) उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०५.२०२५ | उस्मानाबाद गृहनिर्माण स.सोसायटी उस्मानाबाद र.जि.नं.२८२, दि.१८.११.१९६० या संस्थेचे स्थापनेपासुन ते आजपर्यंत उपलब्ध असलेले दस्तऐवज / अभिलेखाची पूर्ण संचिका पाहु इच्छितो कृपया दाखवावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.११.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, संचिका अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही केलेली आहे. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नसल्यास आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.११.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील त्यांच्या विनंतीप्रमाणे संचिका अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, पाहणी करणेसाठी संचिका दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19023 दिनांक : 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे,

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७७८/२०२५**
**बोर्ड क्र.९१**

श्री.सोमनाथ दादाराव डाके,
रा.तांबरी विभाग, बार्शी नाका, धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-०२,
सह जिल्हा निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
खोली क्र.१८, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक वर्ग-०१,
सह जिल्हा निबंधक कार्यालय, प्रशासकीय इमारत, पहिला मजला,
खोली क्र.१८, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २४.०२.२०२५ | स्टॅम्प विक्रेता श्री.व्ही.ए.कंदले तुळजापूर यांचे बाबत तक्रार दि.२६.११.२०२४ प्राप्त दि.२८.११.२०२४ वरील कार्यवाहीची माहिती ०२ मुद्यांवर, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.१६.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती प्रगट केली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-०२, सह जिल्हा निबंधक कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-०२, सह जिल्हा निबंधक कार्यालय, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सह जिल्हा निबंधक वर्ग-०१, सह जिल्हा निबंधक कार्यालय, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।१२

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 19024 **दिनांक :** 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाव्दारे**

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७७९/२०२५**
**बोर्ड क्र.९२**

श्री.सोमनाथ दादाराव डाके,
रा.तांबरी विभाग, बार्शी नाका, धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
उपयंत्र अभियंता,
विभागीय कार्यशाळा, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, विभागीय कार्यालय,
धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.०२.२०२४ | रेडिएटर विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती ०५ मुद्यांवर, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे माहितीपोटीच्या विहित शुल्काचा भरणा देखील केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२१.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहितीपोटीच्या रु.६४६/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित केलेले आहे. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.०८.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, माहितीपोटीच्या रु.६४६/- इतक्या शुल्काचा अपिलार्थी यांनी भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना

आदेशित केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा केलेला असुन त्यांना माहिती अर्जान्वये हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली बहुतांश माहिती आज रोजी सोबत देखील आणलेली आहे. सदर सोबत आणलेली व उर्वरित माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना शिघ्रतेने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती प्राप्त झाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सोबत आणली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपयंत्र अभियंता, विभागीय कार्यशाळा, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18823 दिनांक : 23/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७८०/२०२५
बोर्ड क्र.९३

श्री.सोमनाथ दादाराव डाके,
रा.तांबरी विभाग, बार्शी नाका, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
विभागीय भांडार अधिकारी
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०५.२०२५ | दि.०७.०३.२०२५ रोजी वाहन क्र.१६३३ ने एकुण व्हावचेअर नं.४००५०६ तर गेट पास नं.९६६१ नुसार भांडार शाखेत एकुण टायर किती प्राप्त झाले, किती टायर कमी आले, त्या संबंधी केलेला पंचनामा, जबाबदार कोणाला धरले, चारसिट देऊन निलंबित केले, सदर प्रकरणातील अभिलेखाच्या सत्यप्रत देऊन भरणा केलेल्या रकमेच्या पावतीसह माहिती द्यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केलेली आहे. सदर मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती दि.१५.०६.२०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः स्विकारुन पोच दिलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०९.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, संगणमत करुन सुनावणीचे पत्र उशिराने पाठविले, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केली असल्याचे दिसुन येत आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी यांचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०८.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18824 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७८१/२०२५
बोर्ड क्र.९४

श्री.सोमनाथ दादाराव डाके, — अपिलार्थी
रा.तांबरी विभाग, बार्शी नाका, धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा न्यायाधीश-१
जिल्हा न्यायालय, धाराशिव

(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.पांडुरंग उत्तमराव बोबडे, वरिष्ठ लिपिक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०७.२०२५ | स्पे.ॲट्रो. क्र.१५/११ मधील शिक्षा पात्र आरोपीकडुन दंडाची रक्कमेबाबतची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केलेल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि.२८.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१८.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती

मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 18825 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७८२/२०२५
बोर्ड क्र.९५

श्री.भास्कर महादेव वारे,
रा.साहिल कॉम्प्लेक्स, नगर रोड, भुम, ता.भुम, जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
तंत्र अधिकारी,
उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, खोली क्र.२२, भूम, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय कृषि अधिकारी,
उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पहिला मजला, खोली क्र.२२, भूम, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०६.२०२५ | सन २०२४-२५ कालावधीमध्ये भूम परंडा वाशी कळंब तालुक्यामध्ये तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत राबविलेल्या जलयुक्त शिवार योजनेतंर्गत सिमेंट नाला बांध व कंपार्टमेंट बडिंग मंजूर झालेल्या कामांच्या गावाची यादी, गट नंबर, शेतकऱ्याचे नाव, सदरील कामांचे मंजूरी आदेश व मोजमाप पुस्तिकेच्या छायांकित प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेतलेली नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती जाणीवपूर्वक न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपविभागीय कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, धाराशिव यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०.०८.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 19025 दिनांक :- 31/12/2025 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ४७८३/२०२५**
**बोर्ड क्र.९६**

श्री.भास्कर महादेव वारे, — अपिलार्थी
रा.साहिल कॉम्प्लेक्स, नगर रोड, भुम, ता.भुम, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, भुम, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, भुम, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०५.२०२५ | १. सन २०२२-२०२३, २०२३-२०२४, २०२४-२०२५ मौजे वाकवड येथे खरीप व रब्बी हंगाम अंतर्गत कोणकोणते प्रकल्प राबविण्यात आले त्याचा तपशिल, २. शेतकऱ्यांना वाटप केलेल्या निविष्ठा बी-बियाणे, कीटकनाशके वाटप केलेल्या शेतकऱ्याचे नाव व वाटप रजिस्टरचे छायांकित प्रत, ३. कोणकोणत्या शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर निविष्ठा, बी-बियाणे, कीटकनाशके वाटप केली त्या वाटप रजिस्टरचे छायांकित प्रत, ४. कोणकोणत्या शेतकऱ्यांना लोकवाट्यावर निविष्ठा, बी-बियाणे, कीटकनाशके वाटप केली त्या वाटप रजिस्टरचे छायांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.२१.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

तसेच जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्ज गांभिर्याने हाताळला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द योग्य ती कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती जाणीवपूर्वक न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भुम, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भुम, जि.धाराशिव यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.२४.०२.२०२६ रोजी आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. तालुका कृषि अधिकारी, तालुका कृषि कार्यालय, भुम, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्र २११६)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.** 19026 **दिनांक :-** 31/12/2025 **नोंदणीकृत टपालाव्दारे**

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २७१/२०२५**
**बोर्ड क्र.९७**

श्री.अशोक दत्तु देशमुख,
रा.घर नंबर ६३०, वेताळ नगर, तुळजापूर, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.चंद्रकांत सुवर्णकार उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०९.२०२४ | १. मौजे सुर्डी ता.जि.धाराशिव येथील गावचा सर्वे नं.चा नकाशा व गट नं. नकाशा, २. मौजे सुर्डी येथील गट नं.च्या गाव नकाशावरील पायमार्ग (रस्ता) सुची व रस्त्याची रुंदी व गाडी मार्ग (गाडी रस्ता) सुची व गाडी मार्ग रुंदी, ३. मौजे सुर्डी येथील जुना सर्वे नं. नकाशावरील पाय मार्ग (रस्ता) सुची व रस्त्याची रुंदी व गाडी मार्ग (गाडी रस्ता) सुची व गाडी मार्ग रस्त्याची रुंदी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना ओदशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थीस आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.२६.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या

युक्तिवादात अवगत केल्यप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18826 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १२८७/२०२५
बोर्ड क्र.९८

श्री.अभय विलास माने, — अपिलार्थी
रा.शुक्रवार पेठ पुणे गल्ली, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०३.२०२५ रोजी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.रघुनाथ देवकते उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.१२.२०२४ | सन २०२२ ते २०२४ मधे आपल्याकडे दिवसाकाठी घर व शेतीचे नकलासाठी किती अर्ज येतात, त्या दिलेल्या नकलाचे चलनाच्या नक्कल प्रती तपशिलवार मिळणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीससोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज प्राप्त झाला असुन या अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे. अशी माहिती द्यावयाची झाल्यास त्यासाठी कार्यालयाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री अतिरिक्त प्रमाणावर वळवावी लागणार आहे. याचा विपरित परिणाम कार्यालयीन कामकाजावर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या सर्व बाबी विचारात घेऊन अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१९.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, नेमक्या तपशिलाची माहिती हवी असल्यास ती माहिती कार्यालयाकडुन उपलब्ध करुन देण्यात येईल, असे अपिलार्थीस वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न

मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मोघमपणे मागितलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18821 दिनांक : 29/12/25

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १४००/२०२५**
**बोर्ड क्र.९९**

श्री.गुरुसिध्दमा बसवण्णा कोनाळे, — अपिलार्थी
रा.फ्लॅट नं.२००२, कासा फॉरेस्ट, लोढा प्रिमिअर, कल्याण शिळ रोड, डोंबिवली (पूर्व)

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.रघुनाथ रामभाऊ देवकते उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.१२.२०२४ | शेत जमीन मोजणी संबंधी तपशिल, मौजे किलज, जानेवारी २०२२ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या सुनावणी नोटीससोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज प्राप्त झाला असुन सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, संचिकेचा शोध घेतला असता ती आढळुन आली नसल्यामुळे शोध पूर्ण होताच माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थी यांना वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अवगत करण्यात आलेले आहे. अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा शोध घेऊन ती उपलब्ध करुन देण्याकरिता आणखी काही कालावधी देण्यात यावा, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली

आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी, संचिकेचा शोध होताच माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपअधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18808 दिनांक :- 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६२३/२०२५**
**बोर्ड क्र.१००**

श्री.अंबादास बाळासाहेब वऱ्हाडे, — अपिलार्थी
रा.वेताळ नगर, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.रघुनाथ रामभाऊ देवकते उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०१.२०२५ | दुरदर्शन संच, दुचाकी वाहन, चारचाकी वाहन खरेदी करीत असताना वरिष्ठ कार्यालयाची परवानगी घेतली असेल तर वरिष्ठ कार्यालयाचे नाव व पत्ता दिनांक आवक जावक क्रमांक द्यावा व इतर ०४ मुद्यांवर माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी नेमकी माहिती मागितलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मोघमपणे मागितलेली आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे

असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत. सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18829 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३८००/२०२५**
**बोर्ड क्र.१०१**

श्री.उमेश राजेंद्र गोसावी, — अपिलार्थी
रा.आरळी बुद्रुक, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.रघुनाथ रामभाऊ देवकते उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| निरंक | एकाच गटाच्या झालेल्या मोजणीमध्ये तफावत असल्याबाबतची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या आयोगाकडील सुनावणी नोटीससोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कार्यालयाकडे प्राप्त झालेला आहे. या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती दि.२०.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, एका गटाच्या दोन वेळेस मोजणी होऊन वेगवेगळ्या हद्दी, हद्दी खुणा कायम केलेबाबत, चुकीची माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन

येत आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना नमूद केलेले प्रयोजन विचारात घेता, माहितीची मागणी करण्यामागे अपिलार्थी यांची काही तक्रार असल्याचे दिसुन येत आहे. या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18880 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४०५४/२०२५
बोर्ड क्र.१०२

श्री.आण्णासाहेब पांडुरंग गुंड, — अपिलार्थी
रा.सुरतगाव, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.रघुनाथ रामभाऊ देवकते उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०३.२०२५ | १. मौजे सुरतगांव येथील भानुदास सदाशिव गुंड यांच्या नावे असलेले जुना सर्वे नं.२० पोट हिस्सा नं.६ क्षेत्र ०० हे.२९ आर पोट हिस्सा नं.८ क्षेत्र ०० हे १२ आर. यांचे योजना पत्रक, शेत पुस्तक, जबाब नक्कल, आकार बंद, हिस्सा फॉर्म नं.४, ही सर्व टिपा बुक नकला मिळावे,<br>२. भानुदास सदाशिव गुंड यांच्या नावे असलेले सर्वे नं.२१ पोट हिस्सा नं.आ/२ क्षेत्र ०० हे. ४५ आर यांचे योजना पत्रक, शेत पुस्तक, जबाब नक्कल, आकार बंद, हिस्सा फॉर्म नं.४ ही टिपण बुक सर्व नकला मिळावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. प्रस्तुत प्रकरणाच्या सुनावणी नोटीससोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज प्राप्त झ

ालेला आहे. सदर माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती कार्यालयाच्या appleabhilekh.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे संकेतस्थळाच्या पत्यासह वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे संकेतस्थळाच्या पत्त्यासह कळविली असल्याचे दिसुन येत आहे. जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती माहिती कागदपत्र स्वरुपात उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 18881 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २९०९/२०२५
बोर्ड क्र.१०३

श्री.शहाजी नानासाहेब बनगर,
रा.गट नं.६४, प्लॉट नं.५९, अंजनी पार्क, पाखरी पळशी (शहर),
छत्रपती संभाजीनगर
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, भूम, जि.धाराशिव
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, भूम, जि.धाराशिव
: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१०.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २७.०१.२०२५ | मौजे माणकेश्वर ता.भूम येथील गट नंबर ७८२, ७८३ चा खाते उतारा व गट नकाशा, सर्वे नंबर ३२७ चा पोटहिस्सा मोजणी शिट नकाशा व न.नंबर ४ चा उतारा,<br>यापूर्वी आपल्या कार्यालयास दि.१९.०९.२०१४ ला अर्ज केला होता, परंतू माहिती देताना जी कागदपत्रे मागितली होती त्या कागदत्राची माहिती न देता दुसऱ्या कागदपत्राची माहिती पुरविण्यात आली, तरी संबंधित कागदपत्राची पुन:श्च मागणी करत आहे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, पूर्ण माहिती न पुरविता सुनावणी घेतली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी

यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, मौजे माणकेश्वर येथील गट नंबर ७८२, ७८३ चा खाते उतारा नक्कल, सर्व्हे न .३२७ चे टिपण व पोट हिस्सा टिपण नक्कल पुरविण्यात येत असुन गट नं.७८२, ७८३ चा गट नकाशा तसेच सर्व्हे नंबर ३२७ चा पोट हिस्सा मोजणी शिट नकाशा, न.नंबर ४ चा उतारा याचा अभिलेखात शोध घेतला असता आढळुन आले नसल्याने पुरविता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्याचे व जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत अर्जदारास कळविले असल्याचे आणि जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील नामंजूर केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.०६.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-18883- दिनांक :-29/10/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७४६ व ७४८/२०२५ (०२)**
**बोर्ड क्र.१०४ व १०५**

श्री.सैलानी हाजिमलंग शेख,
रा.मलकापुर, ता.कळंब, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, कळंब, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, कळंब, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.दिलीप विठ्ठलराव जाधव व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधीक्षक, श्रीमती माधुरी शिवराज तेलंग उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १०४ | १८.११.२०२४ | दि.१९.०९.२०२३ मौजे मलकापुर ता.कळंब, जि.धाराशिव गट क्र.२१४ मो.र.क्र.१०० कोर्ट वाटप मोजणी फीस भरलेली छायांकित प्रत मिळावी, |
| १०५ | १८.११.२०२४ | मौजे मलकापुर गट क्र.२१४ मो.र.क्र.१०० दि.१९.०९.२०२३ रोजी कोणत्या न्यायालयाच्या आदेशावरुन दिवाणी न्यायालय कळंब व न्यायदंडाधिकारी तहसिलदार कळंब व कोणत्या न्यायालयाच्या आदेशावरुन दि.१९.०९.२०२३ रोजी मौजे मलकापूर येथे मोजणी नोटीस काढण्यात आली त्याची छायांकित प्रत मिळावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोनही माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.१६.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये

उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळावी, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18881 दिनांक : 29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४००८/२०२५**
**बोर्ड क्र.१०६**

श्री.विकास उत्तमराव चव्हाण,
रा.गांधी नगर, कळंब, ता.कळंब, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, कळंब, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, कळंब, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.दिलीप विठ्ठलराव जाधव व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधीक्षक, श्रीमती माधुरी तेलंग उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०२.२०२५ | दि.११.०३.२०२४ रोजीचे आपल्या कार्यालयात नामांतर अर्ज प्रकरणाची माहिती ०४ मुद्यांवर, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी संचिका आढळुन येत नसल्याचे मोघमपणे कळविलेले आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२८.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, नामांतर संचिका मिळुन आली नसल्यामुळे पुरविता येत नाही, सदर संचिका शोधण्याचे काम चालु असुन प्राप्त होताच माहिती पुरविण्यात येईल, असे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. या नंतर दि.१२.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, नामांतर संचिका कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा आणखी कसोशिने शोध घेण्याकरिता काही कालावधी उपलब्ध करुन देण्यात यावा. त्यानुसार माहितीचा पुन:श्च शोध घेऊन

उपलब्ध झालेली माहिती अपिलार्थीस देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी दि.२३.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अद्याप माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊनही ती उपलब्ध झाली नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक असलेली माहिती सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार उपअधीक्षक, भूमि अभिलेख, कळंब, जि.धाराशिव यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, कळंब, जि.धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीचा कार्यालयातील दोन जबाबदार कर्मचारी यांचा एक गट तयार करुन शोध घ्यावा. अशी कार्यवाही करताना रोजनामा ठेवण्यात येऊन दैनंदिन कामकाजाची नोंद त्यात घेण्यात यावी. या कार्यवाहीदरम्यान उपलब्ध झालेली माहिती, अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अशी कार्यवाही आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत पूर्ण करावी.

२. वर नमूद केल्याप्रमाणे शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास अशी माहिती जतन करुन ठेवावयाची जबाबदारी ज्या अधिकारी / कर्मचारी यांची होती त्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, धाराशिव यांनी महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील कलम ९ नुसार एफ.आय.आर. दाखल करण्याबाबतची कार्यवाही अनुसरावी. अशी कार्यवाही अनुसरताना सर्व वस्तुनिष्ठ बाबी विचारात घेण्यात याव्यात.

३. जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18884 दिनांक : 29/12/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, धाराशिव

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५६७/२०२५**
**बोर्ड क्र.१०७**

श्री.प्रेमनाथ मनोहर सुर्यवंशी,
रा.मतोळा, पो.नारंगवाडी, ता.उमरगा, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, उमरगा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख कार्यालय, उमरगा, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| निरंक | नारंगवाडी कासारसिरसी/१३२/KVA मोजणीसाठी देण्यात आलेला प्रस्ताव व इतर माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जावर दिनांक नमूद केलेला नाही, तसेच माहिती अर्ज सादर केल्याबाबत कार्यालयाची पोच अथवा पोस्टाची पावती सोबत सादर केलेली नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मोघम स्वरुपाची असुन अशा स्वरुपातील माहितीचा माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 18885 दिनांक : 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६४९ ते ३६५१/२०२५ (०३)**

श्री.अजिनाथ अंगद राऊत,
रा.राऊत गल्ली, जवळा (नि), ता.परंडा, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक आयुक्त,
समाज कल्याण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुनी डालडा फॅक्ट्री मार्केट यार्ड, शिवनेरी गेट समोर, लातुर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, श्री.सचिन कृष्णा कवले उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १०८ | ०१.०४.२०२५ | नॅशनल दलीत मुव्हमेंट फॉर जस्टीस या संघटनेच्या वतीने दि.१२.१०.२०२३ व दि.०५.०७.२०२३ रोजी आपल्या कार्यालयास दिलेल्या निवेदनावर केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच सन १९८९ ते आजपर्यंत ॲट्रोसिटी ॲक्ट अंतर्गत खुन प्रकरणाची यादी सदर प्रकरणातील वारसांना पेन्शन मंजुर केलेला मंजुरी आदेश पेन्शन मंजुर करण्याअभावी प्रलंबित राहिलेल्या खुन प्रकरणाची यादी, प्रलंबित राहण्याचे कारण ही माहिती देण्यात यावी, |
| १०९ | ०१.०४.२०२५ | महिलांविषयक गोपनिय सर्व गुन्हे वगळून इतर ॲस्ट्रोसिटी ॲक्ट कायद्यातंर्गत दि.०१.०१.२०२० ते आजपर्यंत आपणास प्राप्त झालेल्या एफआयआर चे गुन्हा रजिस्टर नंबर व नोंद झालेली तारीख, दोषारोपपत्राअंती लागलेली कलम, अत्याचारग्रस्तांच्या नावाची यादी त्यांना अर्थसहाय्य कोणत्या कलमानुसार मंजुर केलं तसेच अदा केलेली प्रत्येक रक्कम, अदा करण्यासाठी प्रलंबित असलेल्या |

| | | |
|---|---|---|
| | | अत्याचारग्रस्तांची नावे, प्रलंबित राहण्याची कारणे ही सर्व माहिती, |
| ११० | ०१.०४.२०२५ | महिलांविषयक गोपनिय सर्व गुन्हे वगळून इतर अॅस्ट्रोसिटी अॅक्ट कायद्यातंर्गत दि.०१.०१.२०१५ ते आजपर्यंत आपणास प्राप्त झालेल्या एफआयआर मध्ये आरोपींना शिक्षा लागलेल्या गुन्ह्याचे रजिस्टर नंबर व नोंद झालेली तारीख शिक्षा झाल्यावर अर्थ सहाय्याचा तिसरा हफ्ता अदा केलेल्या अत्याचाराच्या नावाची यादी व त्यांना अर्थसहाय्य कोणत्या कलमानुसार मंजुर केले तसेच अदा केलेल्या अर्थसहाय्याची प्रत्येकी माहिती आरोपींना शिक्षा लागलेल्या केसेस मध्ये अर्थसहाय्याचा तिसरा हफ्ता देण्यासाठी प्रलंबित असलेल्या अत्याचारग्रस्तांची नावे प्रलंबित राहण्याची कारणे ही सर्व माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. या प्रकरणी माहिती अर्जाव्दारे ज्या माहितीची मागणी केलेली आहे तशीच माहिती जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांचेकडे मागितलेली असुन या संदर्भातील व्दितीय अपिलांची सुनावणी दि.२६.११.२०२५ रोजी आयोगासमोर प्रस्तावित करण्यात आलेली आहे. समाज कल्याण विभागाकडुन तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडुनही अभिप्रेत माहिती मिळालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अगवत केले की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन बहुतांश माहिती त्रयस्थपक्षाशी निगडित आहे. अपिलार्थी यांच्या तीनही माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२५.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या तीनही प्रथम अपिलांवर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. अपिलार्थी यांनी या प्रकरणी ज्या माहितीची मागणी केलेली माहिती तशीच माहिती अपिलार्थी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्याकडे माहिती अर्ज सादर करुन मागितलेली आहे. सदर माहिती अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन समाज कल्याण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत. या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलांवर आयोगासमोर दि.२६.११.२०२५ रोजी सुनावणी प्रस्तावित करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या सर्व माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही जनहित नाही. त्यांनी मागणी केलेली माहिती सारासार विचार न करता प्रगट केल्यास या माहितीचा दुरुपयोग होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच सदर मागणी केलेली बहुतांश माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे अशी माहिती उघड केल्यास त्रयस्थपक्षाच्या खाजगी बाबीमध्ये आंगतुक हस्तक्षेप होण्याची शक्यता देखील नाकारता येणार नाही. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या सर्व माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देत नाहीत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी विस्तृत, व्यापक तसेच त्रयस्थपक्षाशी संबंधित माहिती मोघमपणे मागितलेली आहे. विस्तृत स्वरुपाची माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत. तसेच त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे

आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

प्रस्तुत प्रकरणात, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर दि.२८.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, कलम २ (च) नुसार उपलब्ध माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर निर्णय पारित करताना, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी इत्यादी बाबी विचारात न घेता माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर दि.२८.०५.२०२५ रोजी पारित केलेले निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-18886 दिनांक :29/12/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४२३५/२०२५**
**बोर्ड क्र.१११**

श्री.राठोड नामदेव अंबादास, — अपिलार्थी
रा.सेवालाल कॉलनी, तोरणा कॉलेज जवळ, येडशी रोड,
ता.जि.धाराशिव

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक संचालक,
इतर मागास बहुजन कल्याण, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्रादेशिक उपसंचालक,
इतर मागास बहुजन कल्याण (प्रादेशिक) विभाग, लातुर

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| दि.२०.०५.२०२५ | प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा शिंगोली तांडा, ता.जि.धाराशिव बाबत १९ मुद्यांवर माहिती. |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक, मोठ्या कालावधीची तसेच मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी

पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.- 18883 दिनांक :- 29/12/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४०० व १४७५ ते १४८१/२०२५ (०८)**

श्री.वैजनाथ शामराव सुरवसे,
रा.गांधी मार्केट, स्टेशन रोड, परळी वै., ता.परळी वै., जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
उपजिल्हा रुग्णालय, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी,
उपजिल्हा रुग्णालय, तुळजापूर, जि.धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २४.११.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०१.२०२५ (०१) व दि.१५.०४.२०२५ (०७) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये आठ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, डॉ.अविनाश ज्ञानदेव ढगे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी, डॉ.हनुमंत विनायकराव होनमाते उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या आठ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ११२ | २४.०६.२०२४ | १. डायटिशन अधिकारी उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर यांच्या ड्युटीतील कार्यकाळ व टाईमिंग काय आहे व हफ्त्यातुन किती वेळा येतात याची पूर्ण डिटेल देण्यात यावा, डेली ड्युटी करत असल्याचा टाईमिंग वेळ व रजिस्टरच्या किर्द नोंदीसह माहिती,<br>२. उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर या ठिकाणी सकाळचा नाष्टा सकाळचे जेवण व सध्याकाळचे जेवण त्यांनी जेवण किंवा अन्य वस्तु तसेच पेशंटसाठी येणाऱ्या व चेक केलेल्या मागील दोन महिन्याच्या सत्यप्रती व व्हिडीओ फुटेज व सीसीटीव्ही कॅमेरा फुटेज देण्यात यावा मागील दोष महिन्यापासुन किंवा ४५ दिवसाच्या किंवा शासकीय अधिकाऱ्याच्या नियमानुसार, |
| ११३ | १९.१२.२०२४ | १. सन २०१५ ते सन २०२४ या काळात आपल्या शासकीय हॉस्पिटलला पुरविण्यात आलेल्या चादर उसवशी व बेडशीट व खिडक्या दरवाज्याची पडद्या व गादीच्या खोळ याची प्रत्येक किती वर्षाला शासनामार्फत देण्यात येणाऱ्या सेवेचा जीआर द्यावा व इतर ०६ मुद्यांवर माहिती, |
| ११४ | १९.१२.२०२४ | १. हॉस्पिटलमध्ये होत असलेली स्वच्छता व उपजिल्हा रुग्णालय आजुबाजूची स्वच्छता तसेच परिसराच्या भोवती दवाखान्याच्या मार्फत करण्यात येणाऱ्या सर्व सुख सोयी याबाबतचा ०१ जानेवारी २०१५ पासुनचा आजतागायतचा जीआर देण्यात यावा व इतर ०२ मुद्यांवर माहिती, |

| | | |
|---|---|---|
| ११५ | १९.१२.२०२४ | १. दि.०१ जानेवारी २०१५ ते दि.०८.०८.२०२४ आजतागायत उपजिल्हा रुग्णालय कपडे धुण्यासाठी देण्यात आलेले लॉन्ड्री धारक याला प्रत्येक दिवसाठी हफ्त्यांतील सात दिवसांसाठी देण्यात आलेल्या कापडाचा प्रत्येक दिवसागणिक व कापड घेऊन घेतल्यानंतर महिन्यातील किती वेळेस कपडे धुण्याच्या बाबतीतचे टेंडर देण्यात आले त्याची संपूर्ण जीआरसह माहिती व ०३ मुद्यांवर माहिती, |
| ११६ | १९.१२.२०२४ | १. दि.०१ जानेवारी २०२० ते दि.०८.०८.२०२४ पर्यंत शासकीय हॉस्पिटल उपजिल्हा रुग्णालय तुळजापूर या ठिकाणी हॉस्पिटलच्या डेंटिंग पॅटिंग व इतर कामासाठी आवश्यक असणाऱ्या शासनाच्या जीआर नुसार करण्यात आलेल्या हॉस्पिटलच्या संपूर्ण कामासाठी आवश्यक असणाऱ्या शासनाच्या जीआरनुसार देण्यात आलेल्या पूर्ण कामाची डिटेल देण्यात यावी व इतर ०२ मुद्यांवर माहिती, |
| ११७ | १९.१२.२०२४ | १. दि.०१ जानेवारी २०२० ते लॉकडाऊन चे कार्य काळापासुन ते दि.०८.०८.२०२४ आजतागायत या ठिकाणी सी ओ टू (ऑक्सिजन) याची किती रुग्णांना सेवा पुरवण्यात आली त्या रुग्णांचा बायोटाडा व ॲडमिटसह देण्यात आलेल्या ऑक्सिजन पुरवठ्याची संपूर्ण ऑडिट सह दवाखान्यात मागवण्यात आलेल्या ऑक्सिजन टाक्या व दवाखान्यात उपलब्ध असणारा साठी २०२० ते दि.०८.०८.२०२४ ते आता ऑक्सिजनचा किती साठा करण्यात आला किती मागवण्यात आला व किती वापरण्यात आला याची संपूर्ण रुग्णासह वापरण्यात आलेल्या ऑक्सिजनची डेटासह माहिती ऑडिट पुराव्यासह देण्यात यावी व इतर ०३ मुद्यांवर माहिती, |
| ११८ | १९.१२.२०२४ | १. दि.०१ जानेवारी २०१५ ते दि.०८.०८.२०२४ या काळात आपल्या शासकीय हॉस्टिटला पुरविण्यात आलेल्या चादर उसवशी व बेडशीट व खिडक्या दरवाज्याची पडद्या व गादीच्या खोळ यांची प्रत्येक किती वर्षाला शासनामार्फत देण्यात येणाऱ्या सेवेचा जीआर द्यावा व इतर ०१ मुद्यांवर माहिती, |
| ११९ | १९.१२.२०२४ | १. उपजिल्हा रुग्णालय हॉस्पिटल तुळजापुर मध्ये ०१ जानेवारी ते २०१५ पासुन ते ०८.०८.२०२४ आजचा शासकीय हॉस्पिटलमध्ये रुग्णांसाठी सकाळचा नाष्टा दुपारचा जेवण व संध्याकाळचे जेवण ह्या जेवणासाठी ज्या टेंडर धारकाची शासनाने निवड केलेली आहे त्या टेंडर धारकाचा जीआर देऊन शासनाने हॉस्पिटलमधील रुग्णांना जेवणासाठी आवश्यक गोष्टींचा व देण्यात येणाऱ्या सेवेचा डायटेशनच्या अहवालानुसार डेली अपडेटसह प्रत्येक दिवसाचा जीआर देण्यात यावा व ०३ मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे. सदर मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची आहे. सदर माहिती अपिलार्थीस द्यावयाची झाल्यास कार्यालयाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री प्रमाणापेक्षा जास्त वळवावी लागणार आहे. याचा विपरित परिणाम कार्यालयाच्या दैनंदिन कामकाजावर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अपिलार्थी यांनी रास्त माहितीची मागणी केली असती तर ती दैनंदिन कामकाज सांभाळुन उपलब्ध करुन देणे शक्य झाले असते. अपिलार्थी वारंवार अर्ज सादर करतात. अपिलार्थी यांचा माहितीची मागणी करण्यामागील हेतु लक्षात येत नाही. परंतु प्रशासनावर दबाव निर्माण करण्याच्या हेतुने मोठ्या प्रमाणावरील माहिती मागितली असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जांचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी विस्तृत व व्यापक स्वरुपाची माहिती मोघमपणे मागितली असल्याचे दिसुन येत आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी

एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त आठ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १४४४४ दिनांक: 29/12/2025